COLLECTOR OF
JUN 1937
BOMBAY

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १३ अंक ४,५ व ६.] आ.,श्रा.व अ.भा. [श.१८५८

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्

O.T.
29 JUN 1937



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—सुंदरराव दी. नवलकर

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| संपादकीय ... ... ... ... | १ |
| सती जयदेवी ... ... ... ... | २—५ |
| श्रीसाईनाथ कथा-करण्डक ( कथा २ री ) ... ... | ६—८ |
| स्वप्न कीं दृष्टांत ? ... ... ... ... | ९—१२ |
| श्रीसाई लॉज ... ... ... ... | १३—१४ |
| नमन ( पद्यें ) ... ... ... ... | १५ |
| शिर्डीवृत्त ( जानेवारी १९३७ ) ... ... ... | १६—२० |
| कर्जाऊ रकमांचीं पत्रकें ( नं. १-२-३-४ ) ... ... | २१—२४ |
| श्रीसाईसच्चरित अध्यात्म निरीक्षण ( अध्याय २ रा ) ... | १३ - २० |


# विनंती

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, ज्यांनीं वर्गणी अद्यापि पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी, अथवा V.P. करण्याचें सुचवावें.

## कै. श्रीम्हाळसापति अंक

श्रीसाईसद्भक्तांच्या सोयीसाठीं कै. म्हाळसापति व कै. दीक्षित अंक वेगळे प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. अनुक्रमें किंमत ३ व ४ आणे. तरी जिज्ञासूंनीं त्याप्रमाणें मागणी करावी, ही विनंती

व्यवस्थापक — **श्रीसाईलीला**

श्रीसाईभुवन, १४१ प्रिन्सस स्ट्रीट, मुंबई २

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमच्याकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल. ——प्रकाशक

कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर अथवा अण्णासाहेब दाभोळकर कृत **श्रीसाईसच्चरित**, किं. रु. ३॥.

Shri Sai Baba of Shirdi ( A Glimpse of Indian Spirituality) in English, by Rao Bahadur M. W. Pradhan, Price Re. 1.

**श्रीसाईबाबा कीर्तनाख्यान**, **श्रीसाई दत्त जन्माख्यान**, श्रीयुत बा. वि. देव कृत, **श्री. सद्गुरु साईनाथ सगुणोपासना**, किं. प्रत्येकीं दोन आणे.

**सुंदरराव दी. नवलकर,**
ऑ. चिटणीस,
शिर्डी संस्थान कमिटी.

# श्रीसाई बाबा

## संपादकीय

या अंकात माझ्या राजीनाम्याची नक्कल शिर्डीवृत्त या सदराखालीं प्रसिद्ध केली आहे.राजीनामा देण्याचें कारण कांहींना शिर्डी संस्थानचा अनागोंदीचा कारभार श्रीसाईलीला मासिकामार्फत उघडकीस आणला जात आहे तो मार्ग पसंत नाहीं. जे श्रीसाईभक्त शिर्डी संस्थानास वर्गण्या देतात त्यांचा विनियोग त्यांनीं ज्याकरितां त्या दिल्या आहेत त्याप्रमाणें न होतां संस्थान कमिटीच्या मर्जीप्रमाणें होऊं लागला, तर त्या भक्तांना तसें कळवयास नको काय ? त्याचप्रमाणें संस्थानच्या कारभाराची व्यवस्था कशी काय चालली आहे हेंही त्यांना समजावयास नको काय ? या गोष्टी त्यांना श्रीसाईलीला मासिकाशिवाय कळवयास व समजावयास दुसरा कोणता मार्ग आहे ? संस्थानच्या अंतस्थ परिस्थितीबद्दल गोष्टी त्यांना कां कळूं नये, याबद्दल श्रीसाईभक्तांनीं विचार करावा. प्रत्येक वर्षाचा संस्थानचा अहवाल व हिशेबाचा आढावा वेळेवर श्रीसाईलीलेमार्फत कां प्रसिद्ध करण्यांत येत नाहीं त्याचें कारण त्यांना समजावयास नको काय ? यापुढें Caesar's wife should be above suspicion म्हणजे मोठ्या लोकांच्या वर्तनाबद्दल कोणी संशय घेतां कामा नये, या विचारसरणीप्रमाणें श्रीसाईभक्तांनीं कमिटीच्या कोणा एका सभासदाबद्दलही ते केवळ श्रीसाईभक्त आहेत म्हणून व्यवहारदृष्टयाही संशय घेतां कामा नये. या बाबतींत मला जो आतांपर्यंत मानसिक त्रास वगैरे होत आहे, तो तसाच सोसावा लागणार आहे. तो सोसण्यास आजपर्यंत श्रीसाईबाबांनीं धैर्य व शक्ति जी दिली, तसेंच धैर्य व शक्ति तो त्रास पुढेंही सोसण्यास देतील याबद्दल बिल्कुल शंका नाहीं.

मराठी लिटररी सोसायटी सेन्ट झेवियर कॉलेज यांजकडून " पखरण " पुस्तकाची एक प्रत आली आहे. त्याबद्दलचा निर्देश मागील अंकात करण्याचा राहून गेला.

त्याचप्रमाणें मागील अंकांत शिर्डीवृत्त सदराखालील श्रीपुण्यतिथि उत्सवाच्या मजकुरांत खालील मजकूर घालण्याचा चुकून राहिला होता तो येणेंप्रमाणें:- सौ. लक्ष्मीबाई गाडगीळ ह्यांनीं त्यांचा नोकर सीताराम याजसह नेहमीप्रमाणें उत्सवाच्या आधीं दोन दिवस येऊन कोठीची व्यवस्था उत्तम ठेविली होती. त्यांनीं कोठीची व्यवस्था पाहण्याचें काम हातांत घेतल्यापासून त्यांत पुष्कळ फायदेशीर सुधारणा आजपर्यंत केल्या आहेत. अशा रीतीनें त्या आज कित्येक वर्षें श्रीसाईबाबा यांची सेवा करीत आहेत.

---

# सती जयदेवी

## कल्याण मासिकावरून. अनुवादक " वासुदेवशर्मा "

तेवीस वर्षांची गोष्ट. संयुक्त प्रांतांतील मैनपुरी जिल्ह्यांत जरावली नांवाच्या गावीं पण्डित रामलाल नांवाचा सुमारें तीस वर्षें वयाचा ब्राह्मण युवक राहत होता. त्याच्या पत्नीचें नांव जयदेवी; ती बावीस वर्षांची होती. रामलाल एके दिवशीं वटेश्वर येथील मेळ्यांत बैलांची एक जोडी खरेदी करण्यासाठीं गेला; परंतु मनाजोगी जोडी मिळाली नाहीं म्हणून तो परत येतांना रस्त्यांत आजारी पडून घरीं आला. आपल्या बीमार पतीचें मुखावलोकन करतांच जयदेवीनें घरच्या मंडळीस सांगितलें कीं, " हे आतां आठ दिवसांचे पाहुणे आहेत." घरांतील मंडळी औषधोपचार करीत असतां जयदेवी त्यांत कोणचाही भाग न घेतां म्हणाली कीं, " ह्यांच्या प्राणांचें रक्षण भगवान् धन्वंतरि सुद्धां करूं शकणार नाहीं; येत्या सोमवारीं हे आपल्या देहाचा त्याग करतील." लोक समजले कीं, इचें मस्तक फिरलें आहे ! पुढें होणारी गोष्ट आज कोण सांगूं शकणार ? म्हणून तिच्या बोलण्याकडे कोणी विशेष लक्ष न देतां उपचार सारखे चालू ठेवले. इकडे जयदेवीनें पन्नास रुपये जमवून त्यांची आणा, दोन आणे, चार आणे आणि आठ आणे अशी मोड आणविली; कापूर, शेंदूर आणि थोडा मेवाही आणवून घेतला. घरांतील मंडळी हें पाहून म्हणाली कीं, पति मरणाच्या पंथाला लागला असतां ही सिंदुर आणून ठेवते, तेव्हां ही खास पागल ( वेडी ) झाली आहे. जयदेवी अहोरात्र तुलसीवृन्दावनाकडे बसून रामायणाचा पाठ करूं लागली; अन्न सेवन करण्याचें तिनें बहुतेक वर्ज केलें. तिचा तेजःपुंज चेहरा पाहून तिला घरांतील कोणीही कांहीं बोलूं शकत नसे. तिनें सांगितल्याप्रमाणें सोमवारीं प्रातःकालीं पण्डित रामलालनें आपल्या नश्वर देहाचा त्याग केला. घरची मंडळी रडून आकान्त करूं लागली, तरी जयदेवीच्या-नेत्रांवाटे एक अश्रुबिंदुही बाहेर पडला नाहीं. जयदेवीनें मुखावरील पडदा फेकून दिला आणि स्नान करून रेशमी वस्त्र आणि अलंकार परिधान केले. डोळ्यांत काजळ घालून, मस्तकाला सिंदुराचा टिळा लावला. तिचा हा चमत्कारिक श्रृंगार पाहून घरांतील मंडळी मंत्रमूढ झाली. तिला हें असें उलटें काय करतेस म्हणून कोणी विचारूं शकला नाहीं, किंवा तिनेंही आपला हेतु कोणास सांगितला नाहीं. लोक रामलालच्या कलेवराला स्मशानाकडे घेऊन जाऊं लागले, तोंच जयदेवीही त्यांच्या मागोमाग चालूं लागली. तिनें एका ताटामध्यें मेवा, फुलें व पूर्वींच आणून ठेविलेलें नाणें भरून तें ताट डाव्या हातांत घेतलें आणि उजव्या हातानें केव्हां फुलें तर केव्हां मेवा, तर केव्हां पैसे

उधळीत चालूं लागली. जमिनीवर पडणारीं नाणीं कोणी गोरगरीब उचलून घेत असत; परंतु आश्चर्याची गोष्ट दिसून आली कीं, तिनें मृतावर उधळलेलीं फुलें जमिनीवर न पडतां उंच आकाशांत उडून जात व अदृश्य होत असत. प्रेत स्मशानांत आल्यावर त्याला स्नान घालून कफन चढविलें आणि तें चितेवर ठेवण्यांत आलें. जयदेवी एकदम चितेवर चढून ती पतीचें मस्तक आपल्या पोटासरशीं धरून बसली. तेथील "मुखिया" (ग्रामाधिकारी) त्या ठिकाणीं आला होता. जयदेवी चितेवर बसलेली पाहतांच तो भयभीत झाला व मस्तक ठणकल्यासारखें करून तिला विचारूं लागला. त्या दोघांतील बोलणें प्रश्नोत्तररूपानें खालीं देतों.

मुखियाः—देवी, आपण चितेवर बसण्याचें कारण काय ?

जयदेवीः—मी सती जाणार आहें, हें तुम्हाला दिसत नाहीं ?

मुखियाः—कोणी सती जाऊं नये, अशी सरकारची इच्छा आहे.

जयदेवीः—तुमच्यासारख्या कमसमजुतीच्या मनुष्याला सरकारची इच्छा समजत नसते. सरकार परीक्षा घेऊन सती जाऊं देतें. असती स्त्रियांना जबरदस्तीनें जाळून टाकण्याची प्रथा सरकारनें बंद केली आहे.

मुखियाः—( तेथील चौकीदाराला ) तूं आतांच्या आतां धांवत जाऊन ठाणे अंमलदारला सांग कीं, रामलालची स्त्री सती जात असून, मुखियाचें निरोधन ती मानीत नाहीं. त्याला बरोबर घेऊन ये.

जयदेवीः—( मुखियाला ) तुझा बाप येथें येईपर्यंत मी बसून राहूं काय ?

मुखियाः—तर मग जाणार कोठें ?

जयदेवीः—सती जाणार ! पतीला बरोबर घेऊन या संसारांतून गडप होऊन जाणार ! तुझ्यासारखा पापी आणि मतिमंद मुखिया आहे, म्हणून तोंपर्यंत मी काय बसून राहूं !

मुखियाः—ठाणेदार येईपर्यंत तुला सती जातां येणार नाहीं.

जयदेवीः—मला कोण प्रतिबंध करणार ?

मुखियाः—मी करीन. या ठिकाणीं जमलेली दोन-तीन हजार मंडळी माझ्या आज्ञेनुसार काम करील.

जयदेवीः—तुम्ही कोणच्या तऱ्हेनें मला प्रतिबंध करूं शकाल ?

मुखियाः—मी आग लावूं देणार नाहीं.

जयदेवीः—श्यामलाल ! घरीं जा आणि पांच शेर तूप घेऊन या.

श्यामलाल हा जयदेवीचा धाकटा दीर असून, ती जगदेवीला पूज्य मानीत असे. मुखियानें मना केलें असतां श्यामलाल धांवत घरीं जाऊन तूप घेऊन आला व जयदेवीनें तें तूप चितेवर सर्वत्र थोडथोडें फेकलें.

जयदेवीः—शामलाल जा आणि विस्तव घेऊन या.

मुखियाः—खबरदार श्यामलाल ! विस्तव आणण्यासाठीं पाऊल पुढें टाक, की तुला येथेंच बांधून ठेवतों कीं नाहीं तें पाहा.

श्यामलालः—आपण आपल्या कर्तव्यांत जसे स्वतंत्र आहां, तसा मीही माझ्या कर्तव्यांत स्वतंत्र आहें. इतकें म्हणून श्यामलाल गांवाकडे धांवत जाऊं लागलेला पाहतांच, मुखियाच्या हुकमानें तेथील पांच जणांनीं त्याला पकडून दोरीनें निवान्या झाडाला बांधून टाकलें.

जयदेवीः—तूं आग आणूं देणार नाहींस ?

मुखियाः—नाहीं देणार; ठाणेदार आल्यावर मग आग मागून घे अगर पाणी मागून घे.

जयदेवीः—आगीशिवाय मी सती जाऊं शकणार नाहीं ?

मुखियाः—कशी जाऊं शकशील ?

जयदेवीनें आपल्या आंगावरील सर्व अलंकार काढून त्यांची गठली श्यामलालपुढें फेकून त्याला सांगितलें कीं, गोरगरिबांना हे सर्व वांटून द्या. तुम्हीं नेहमीं आनंदांत राहाल. परमात्मा तुमचें रक्षण करून कल्याण करील.

मुखियाः—तूं सती आहेस, तर आग पैदा कर.

जयदेवीः—मी स्वयं आग आहें. आगीच्या लोळांत घुसून मला आंच लागणार नाहीं, आग आगीला जाळीत नसते. माझ्या आगीनें मी स्वतःला शेवटीं जाळून घेईनच. पण पहिल्यानें तुला जाळून टाकतें.

इतकें बोलून पतीच्या कानांत तिनें कांहीं सांगितलें, आणि कापूर घेऊन तो दोन्हीं हातांनीं चांगला मळल्यावर तीन वेळां टाळी वाजवून आपले नेत्र वर करतांच मुखिया मूर्च्छित होऊन जमिनीवर पडला. त्या वेळीं जयदेवीच्या नेत्रांतून एक तऱ्हेची ज्योति बाहेर पडत होती असें दिसून आलें. त्या ठिकाणीं दोन वैद्य आणि डॉक्टरीचा अभ्यास करणारा एक विद्यार्थी आले होते, त्यांनीं मुखियावर कांहीं उपचार केले, परंतु कांहींच गुण न येतां तो जास्तीच मरणोन्मुख स्थितींत जाऊं लागला. मुखियाच्या स्त्रीला ही दारुण घटना समजतांच ती धांवत पळत सतीकडे येऊन तिला अनेक साष्टांग प्रणाम

करून म्हणाली, "माते, तुझा प्रभाव मुखिया समजूं शकला नाहीं; जगदम्बे, माझें सौभाग्य रक्षण कर, मला विधवा करून तूं सती जाऊं नकोस. मुखिया तुझा अज्ञान मुलगा समजून त्याला क्षमा कर; मी हा पदर पसरून पतीच्या प्राणांची तुझ्याकडे भिक्षा मागत आहें."

दयाळु जयदेवीनें आपला उजवा हात वर उचलला, आणि आकाशाकडे दृष्टि लावून "क्षमा करा" असें म्हणाली.
तोच मुखिया सचेत होऊन समोर उभा राहिला. ( अर्धा तासपर्यंत बेशुद्धावस्थेंत तो जमनीवर पडलेला होता ) स्मित हास्य करून जयदेवी त्याला म्हणाली, " आतां तरी आग देतां कीं नाहीं ? "

मुखियाः- प्राण जाईपर्यंत मी आग लावूं देणार नाहीं.

हे शब्द ऐकतांच, जयदेवीनें पूर्ववत् हातांत कापूर घेऊन तो रगडल्यावर दोन्ही हातांनीं तीनदां टाळी वाजविली आणि पतीच्या कानांत कांहीं सांगितलें. नंतर दोन्ही हात वर करून व सूर्यनारायणाकडे दृष्टि रोखून म्हणाली ," मी जर वास्तविक सती असेन, तर भगवन्, आग पाठवा! "

हे शब्द उच्चारतांच जयदेवीचे दोन्ही हात जळूं लागले, आणि चिताही आपोआप पेटूं लागली. ठाणेदार आणि दिवाण त्या ठिकाणीं येईपर्यंत चितेसहित जयदेवीचा देह भस्मसात् झाला होता.

लवकरच न्यायाधीशापुढें यासंबंधीं मुकदमा चालू झाला. साक्षीपुरावा घेऊन जज्जानें सर्वांना दोषमुक्त केलें. जज्जानें आपल्या निकालांत लिहिलें आहे कीं, " सती जाण्याच्या कामीं जयदेवीला कोणी सहाय केलें नव्हतें. तिनें मुखियावर विजेचा प्रहार केला होता. त्यानें तो एक तासांत मृत्यु पावला असता; जयदेवीनें स्वतःच आग उत्पन्न केली होती; अशा तऱ्हेची सती आजपर्यंत माझ्या ऐकण्यांत आलेली नाहीं; जयदेवी खरीच सती होती. तिला सती जाण्यापासून कोणीही प्रतिबंध करूं शकला नसता.

जयदेवी सती गेली त्या ठिकाणीं लोकांनीं " सतीचा चबुतरा " बांधला आहे. जज्ज आणि ठाणेदार यांनींही त्या कामीं द्रव्यसहाय केलें होतें.

# श्री साईनाथ कथा-करंडक

## कथा २ री

पुढें कांहीं दिवस गेल्यानंतर एक भक्त त्यांच्या हातांत चिलीम भरून देऊन म्हणाला, "बाबा, आपण अकबर बादशाहाच्या वेळेस होतां,असें आपण मागें सांगितलेंत; तर त्या वेळेस आपण कोठें राहत होतां, आणि बादशाहाला कधीं भेटत होतात का?"

**बाबा** म्हणाले–मी जवळच राहत असें; पण आम्हाला कोण विचारतो? वेडा-पिसा म्हणून कधीं कधीं मला पोरें धोंडेही मारीत असत! मी एखादी पडकी मशीद पाहून राहत असें आणि कोरभर भाकरी-तुकडा मागून निर्वाह करीं.

**भक्त** म्हणाला–आपण बादशाहाला जाऊन कां भेटलां नाहींत? त्यांनीं आपल्या खाण्यापिण्याचा बंदोबस्त ठेवून आपल्याला लागेल तितकी दक्षिणा दिली असती."

**बाबा** म्हणाले–आपल्याला अल्लानीं काय कमी केलें आहे? आपल्याला कशाला लोकांचे पैसे पाहिजेत? माझी आई (एका भक्ताकडे बोट दाखवून) ह्या भावाची घरवाली, जवळच राहत असे. जरूर लागे तेव्हां ती मला भाकर-तुकडा आणून देत असे.

**भक्त** म्हणाला—बाबा, तुमचा भाऊ अकबराकडे नोकरीस होता का?

**बाबा** म्हणाले—त्याला कशाला अकबराची नोकरी पाहिजे होती? तो काशींत राहून श्रीरामभजनांत आपला काल काढीत असे.

**भक्त** म्हणाला—मग तुमची आणि अकबराची कधीं गांठच पडली नाहीं तर?"

**बाबा** म्हणाले–हो, पडली तर. नाहीं कशी? तो आपलाच मनुष्य होता, त्याला सोडून कसें चालेल? माझी-त्याची गांठ पडल्यापासून तो बराच शुद्धीवर येऊन स्वतःला ओळखूं लागला." यानंतर भक्तानें पुढील हकीकत विचारल्यावर, बाबा सां[गूं] लागले, "मी येथें असतांना एका रजपूत सरदाराची एक साध्वी स्त्री नित्य माझ्या दर्श नाला येत असे. एके दिवशीं ती डोळ्यांत पाणी आणून मला म्हणाली, "बाबा! आत मला जिवंत ठेवूं नका, मारून टाका. म्हणजे मी आपल्या धर्मांत असतांना तरी मरे[न] यापुढें परराज्यांत आमच्यासारख्या शीलसंपन्न स्त्रियांना राहणें फार धोक्याचें झा[लें] आहे. आपल्यास माहितच आहे कीं, येथें नौरोजच्या सणाच्या दिवसांत कित्येक स्त्रिय[ां]वर कसा प्रसंग गुदरतो?" असें म्हणून ती बाई मोठमोठे हुंदके देऊन रडूं लागल[ी].

मीं म्हटलें, "आई, तुला भिण्याचें कांहीं कारण नाहीं. तूं सातां समुद्रांपलीकडे असलीस तरी तुझ्याबरोबर राहून मी तुझा संभाळ करीन. असा धीर सोडूं नको आणि अशी रडूंही पण नको. बेलाशक नौरोजच्या समारंभास जा, आणि कसलाही प्रसंग गुदरलातरी माझें स्मरण कर; मी तुला सर्व संकटांतून सोडवीन." हें ऐकून ती आई आपले डोळे पुसून घरीं गेली.

"पुढें एके दिवशीं मध्यरात्रीच्या सुमारास बादशाहानें त्या आईची पाळत ठेऊन तिला एकटीच गांठली, आणि तो तिचा आतां हात धरणार तोंच तिनें प्रसंगावधान राखून आपल्याजवळचा खंजीर काढला आणि माझें स्मरण केलें. इतक्यांत माझ्यासारखा हुबेहुब एक फकीर अकबरापुढें उभा राहून म्हणाला, "का मुकुंदबुवा? बादशाही मदिरेनें इतका धुंद झाला आहेस आं? प्रयागांत आपली मठींत गांठ पडली होती तें इतक्यांत विसरलांत का?" इतकें या फकिरानें म्हटल्याबरोबर बादशहा खरकन उतरला. त्याचा चेहरा फटफटीत दिसूं लागला. मग त्यानें अगोदर त्या आईच्या दोन्ही पायांवर डोकें ठेवून तिची क्षमा मागितली, आणि नंतर फकिराच्या पायां पडणार तोंच तो फकिर अदृश्य झाला. फकिर अदृश्य झाल्याबरोबर बादशाहा वेडा होऊन गेला! त्याला दरदरून घाम सुटला, आणि त्या बाईपुढें दोन्हीं हात जोडून तो म्हणाला," मातुःश्री, हा जो कांहीं प्रकार घडला, ह्याबद्दल माझी आपण समजूत केली नाहीं, तर मी आतांच ह्या खिडकीबाहेर उडी टाकून जीव देईन." असें म्हणून तो खिडकीकडे जाऊं लागला. बाईला आतां दुसरीच भीति उत्पन्न झाली. ती लागलीच बादशाहा आपला मुलगा आहे असा भाव ठेवून, त्याचें मनगट जोरानें धरून म्हणाली, "बाबा, असा अत्याचार करणें तुला योग्य नाहीं. तुला आतां येथें झालें त्या प्रकाराबद्दल जें कांहीं विचारावयाचें असेल तें मी तुला उद्यां सांगेन. खरें पुसशील तर तें मलाही सांगतां येणार नाहीं. परंतु माझा गुरु एक फकीर आहे, त्याच्याकडे तूं आलास तर तो तुला सांगेल. अगर तुला येणें शक्य नसल्यास मी त्याला विचारून मग तुला सांगेन. तो फकीर येथें मजजवळच त्या पडक्या मशिदींत असतो." बादशाहा म्हणाला, "मी उद्यां संध्याकाळीं मशिदींत हिंदु फकिराचा वेष घेऊन येतों. त्या वेळीं आपणही यावें. म्हणजे आपल्या दोघांच्या समक्षच सर्व खुलासा होईल." यावर त्या बाईनें "बरें आहे" असें म्हटल्यावर तीं दोघें दोन्हीकडे निघून गेलीं. दुसऱ्या दिवशीं माझी दुपारची न्याहारी झाल्यावर मी चिलीम पीत बसलों असतां, त्या रजपूतीण आई आल्या आणि माझ्यासमोर हात जोडून उभ्या राहून मोठ्या आनंदानें गहिंवरून म्हणाल्या, "सद्गुरो! काल बरीच बाजू राखिली. आज बादशहा आपल्याकडे येणार आहे." इतक्यांत मी मध्येंच बोललों, "बरें आहे. तूं आतां उदी घेऊन घरीं जा. बादशहाला मला काय सांगावयाचें तें मी सांगेन. तो आतां तुला मुळींच सतावणार नाहीं असें मी सर्व करीन. जा, तूं कांहीं काळजी करूं नको."

बाईच्या मनांतून बादशाहा येईपर्यंत थांबावयाचें होतें.पण मी जा म्हणून सांगितल्यामुळें, तिचा निरुपाय होऊन ती चालती झाली. दोन घंट्यांनंतर बादशाहा गोसाव्याच्या वेषानें आला. काल आपल्या महालांत आलेला फकिर मीच आहें, अशी त्याची खात्री होऊन तो अगदीं गर्भगळित झाला आणि नुसते दोन्ही हात जोडून उभा राहिला. त्याची ही अवस्था पाहून मीं त्याला म्हटलें, साहेब, वसा, असे उभे कां ? तें एकून बादशाहा खालीं बसला; पण मनांत फार खजिल होऊन त्यांच्या तोंडांतून एकही शब्द उमटेना. मग मला त्याची ती स्थिति पाहून दया आली आणि मींच त्याला फिरुन विचारलें, "आपला काय हेतु आहे ? कां आलां होतां ? वगैरे मला समजल्याशिवाय मी आपल्याशीं काय बोलावें ?" हें ऐकून बादशाहा कांपत कांपतच म्हणाला, "मालिक ! खाविंद परवरदिगार !" मीं मध्येंच म्हटलें, " हें आतां पुरे झालें. आपलें काय म्हणणें आहे तें सांगा, म्हणजे मला अल्ला बुद्धि देईल तें मी सांगेन."

**बादशाहा** म्हणाला—परवरदिगार ! मी अधम, जातीनें आपल्यासमोर काय बोलावें ? माझी जीभच वळत नाहीं." इतकें बोलून डोळे मिटून तो स्तब्ध बसला. बराच वेळ गेल्यावर मींच त्याला म्हटलें, "बाबा, अल्लामियानें तुम्हाला एवढा अधिकार दिला आहे कीं, आज जगतांत आपल्यासारखा दुसरा प्रजापालक क्वचितच असेल. आपण सुज्ञ आहां व पूर्वजन्माचें तपःसामर्थ्यही आपल्यांत पुष्कळ आहे.अशा स्थितींत एखादे वेळीं मन आपलें अनावर होऊन एखादें दुराचरण करण्याची इंद्रियांनीं ओढ घेतलीच, तर त्यांच्या शांतीला एखादें तशाच दर्जाचें स्थळ पाहत जावें. आपण समर्थ आहांत. आपल्यास कोणत्याही गोष्टीची उणीव नाहीं. थोडें मन आवरण्याचें आणि योग्यायोग्य पाहून वागण्याचे श्रम घेतले म्हणजे झालें. शिवाय आतां आपलें उतारवय असल्यानें असें करण्यास आपल्यास विशेष श्रमही पडणार नाहींत. " इतकें ऐकल्यावर बादशाहास धीर आला व त्यानें डोळे उघडून माझ्याकडे दीनमुद्रेनें पाहिलें. मीही त्याला अधिक धीर देण्याच्या हेतूनें म्हणालों, " माझ्या एका मित्राचा असा दोहोरा आहे कीं:–" **मन गेलें तर जाऊंदे पण मत जाने दो शरीर.** " हें थोडें-फार आपल्या स्वाधीन आहे. तेवढें तरी आपण करीत राहिलें तर पुष्कळ दुराचरणाचे प्रसंग टळतील.

---

# 'स्वप्न कीं दृष्टांत?'

(लेखक:—**सुमनसुंदर**)

## हें स्वप्न कीं दृष्टांत ?

त्या रात्रीं दिवा मालवून मी अंथरुणावर पडल्याचें मला स्मरतें व जेव्हां जागृति आली, तेव्हांही मी अंथरुणांतच होतों व खोलींत अंधार होता! ह्यावरून झोंपेंतच खालील वृत्तांत घडला असें म्हणण्यास प्रायवाय नाहीं. **पण तें स्वप्न कीं दृष्टांत ?**

—आणि तेथेंही मी झोंपलोंच होतों? कोणी तरी माझ्या पाठींत सटका हाणून मला चेतविलें! मी झोंपेंत जागा झालों व माझा निद्राभंग करणारा धटिंगण कोण म्हणून पाहूं लागलों! तों एक अस्थिपंजर **फकिर**वजा विभूति हातांतील सटक्यानें मला चेतवीत असल्याचें दिसलें! कधीं ना पाहिली ना देखिली! पण मला त्या विभूतीला पाहतां भीति अशी मुळींच वाटली नाहीं, माझा घुस्सा तर तेव्हांच ओसरला व भक्ति-प्रेमाची लहर माझ्या नसानसांतून उमटली? " कोण? बाबा " म्हणून मीं त्या विभूतीचे पाय धरले. त्यांनींही मला उठवून प्रेमानें पोटाशीं धरलें!

**मी:**—बाबा आज इकडे अशी वाट कोठें चुकलांत ?

**बाबा:**—पोरा, मी नाहीं कोठें? मनांत येईल तेव्हां व तेथें मी हजर आहें! मी सर्वांना ओळखतों. पण मला आधीं सांग, तूं मला कधीं पाहिलें नाहींस आणि या स्वरूपांत मला पाहून तूं भ्यालास कसा नाहींस आणि मला ओळखलेंस कसें ?

**मी:**—ही त्या माझ्या दत्तगुरूची कृपा!

**बाबा:**—याची जाणीव तुला आहे तर ?

**मी:**—असें म्हणावयाचें!

**बाबा:**—म्हणजे अजून संदेह येतो वाटतें ?

**मी:**—बाबा, तुमच्यापाशीं मी प्रतारणा कशी करूं? अजून द्वैताद्वैत माझ्यांत निमलें नाहीं, माझें अज्ञान समूळ निरसन झालें आहे असें मला वाटत नाहीं.

**बाबा:**—मग तें कधीं होणार ?

**मीः**—दत्तगुरु मस्तकीं वरदहस्त ठेवील तेव्हां !

**बाबाः**—अल्ला तेरा भला करे गा, बेटा ?

**मीः**—तथास्तु ! पण आर्धी मला इकडे कां आलांत तें सांगा पाहूं ?

**बाबाः**—बेटा, तूं डॉक्टर ना ? म्हणून तर मी आलों तुझ्याकडे दव्याकरितां !

**मीः**—बाबा, माझी थट्टा, तुम्हीं नाहीं करावयाची तर कोणी ? मी डॉक्टर असलों तरी तुम्हाला दवा देण्याची योग्यता माझी नाहीं ! पण तुम्हांला आधीं दव्याची जरूरी तरी काय ? तुम्हीं तर सर्व रोगच कोळून प्याले आहांत !

**बाबाः**—तें खरें रे बेटा ! पण एक रोग मात्र आम्हां लोकांना सुटत नाहीं. **भक्तांची अवनति झाली, कीं अंगाची नुसती लाही लाही होते**; सांप्रत तशीच माझी झाली आहे !

**मीः**—मग मी पामर या रोगावर काय दवा देणार ? वास्तविक आपणच याची जाणीव भक्तांना करून देण्यास हवी !

**बाबाः**—अरे, तें काय तूं सांगावयास हवें ? पण **माझा लोभ मला नडला बघ** ! मी माझ्या भक्तांना लाडावलें ! आणि हेच लाडोबा आतां माझ्या डोक्यावरून हात फिरवूं पाहतात बघ ! माझ्या सांगण्या-करण्याचा कोणीच अर्थ लक्षांत घेत नाहींत !

**मीः**—म्हणजे असें झालें तरी काय ?

**बाबाः**—अरे, तूं वाचलेंस नाहीं का ? **माझ्या भक्तांची अशी अवनति झाली म्हणून माझ्या अंगाची झाली लाही लाही आणि मी दिली तुर्वातिवरची शाल उडवून** !

**मीः**—मग त्यांत बिघडलें कोठें ?

**बाबाः**—अरे, तेंच तर सांगण्याकरितां मी आलों ना तुझ्याकडे ! खरी वस्तुस्थिति अशी असतां हे बेटे काय लिहितात ' श्रींस उन्हाळा लागल्यामुळें आतांपासून शाल पांघरूं नये अशी खूण श्रीनीं दाखविली ' यापेक्षां माझें दुर्भाग्य तें काय ? त्यांनीं माझ्या 'लीला' पाहिल्या, वाचिल्या, वाचताहेत व वाचतीलही ! **पण अळवावरचें पाणी बघ** ! त्यांच्यासाठीं अहोरात्र खपून काढल्या तेव्हां मला ताप झाला नाहीं ! ग्रंथीज्वरासारखे ह्यांचे आजार मी स्वतःच्या शरीरावर सोसले, तेव्हां मला ताप झाला नाहीं ! त्या लोहाराच्या रांडेच्या पोराला मी भट्टींतून हात घालून काढलें, माझा हात होरपळला, तरी मला ताप झाला नाहीं ! धुनीशेजारीं अखंड बसतांना मला ताप झाला नाहीं !

हंडी शिजत असतां उकळत्या पदार्थांत हात घालून मी ते ढवळले, तरी मला ताप झाला नाहीं ! त्या मला म्हणे आतां उन्हाळा लागल्यामुळें ताप होतो व भक्तांनी घातलेली रेशमी शाल मला सहन होत नाहीं ! ! ! धन्य आहे यांच्या जाणीवेची !

**मी**:—मग काय करावयाचें म्हणतां ?

**बाबा**:—अरे करणार काय तूं किंवा मी तरी ! आपलें उगीमुगी बसून राहावयाचें ! पण यांच्या या अशा वागण्यानें अंगाची लाही झाली कीं राहवत नाहीं रे ! कसे रे माझे भक्त अगदीं एकजात मला एवढ्यांतच विसरले ?

**मी**:—बाबा, तुम्हांला तुमचे भक्त विसरले असें कसें म्हणतां ? फार तर तुमची शिकवण विसरले असें म्हणा !

**बाबा**:—**अरे, माझी शिकवण म्हणजे तर माझा प्राण.** त्या प्राणावीण माझ्या 'नांवा'च्या प्रेताला काय चाटावयाचें आहे ? अरे, तत्त्वतः मी अपरिग्रह ! तोच मी यांच्यासाठीं मोहांत पडलों बघ ! आणि त्यांच्या उद्धारार्थ व इतरांना अनुकरणीय व्हावी म्हणून ' शिरडी-संस्थान ' व ' साई-लीला ' यांचा मीं परिग्रह केला. पण आतां पाहावें तों कुऱ्हाडीचे दांडे गोताला काळ, असेंच म्हणण्याची पाळी आली. माझ्या भक्तांनींच त्यांचे धिंडवडे चालविले आहेत. मग माझ्या अंगाची कां लाही होऊं नये आणि नरम रेशमी शालसुद्धां मला कांट्यासारखी कां खुपूं नये ?

**मी**:—मग बाबा तुम्हींच त्यांना प्रेरणा कां देत नाहीं ?

**बाबा**:—उपड्या घड्यावर पाणी बघ ! **मी माझ्या हयातींत निष्काम सेवेचे व सद्भक्तिचे धडे त्यांना स्वतः आचरून दाखविले** ! पण त्यांना त्याचें काय ? म्या गोविंदाला ते विसरले. आणि अहमहमिकेला भाळून संस्थानच्या कारभारांत अनागोंदी माजविली ! माझ्या ' लीले'ची दुर्दशा तर विचारूंच नकोस ! आज कितीजण तरी स्वतःला माझे भक्त म्हणवितात. माझे अनुभव त्यांना प्रत्यहीं येतात. ते प्रत्येकाजवळ सांगत बसण्यास त्यांना वेळ मिळतो. सर्व कांहीं होतें; पण फक्त दोन ओळी लिहून माझ्या 'लीले'कडे पाठविण्यास मात्र त्यांना फावत नाहीं ! आणि 'लीले'च्या वर्गणीदारांची संख्या पाहावी तर क्षयरोग्याच्या शरीरासारखी घटत आहे ! त्यापेक्षां ' संकर, संकर' म्हणतात तो काय वेगळा असतो ?

**मी**:—बाबा, तुम्हीं परत आठ वर्षांचे होऊन अवतार घेणार आहांत ना ? त्याचीच पार्श्वभूमि म्हणून हा संकर तुम्हींच निर्माण केला असेल झालें !

**बाबा**:—वेडा आहेस बेटा ! मी किती अवतार घेतले आणि आणखी किती तरी घेईन ! पण प्रत्येक अवतारांत माझें नाम, रूप व कार्य तेंच का असणार आहे ? त्या त्या

काळमानाप्रमाणें त्यांत फेरबदल होणारच! मग ह्या माझ्या अवतारकार्याच्या गोष्टी पुनः सांग, तशीच कोणाला मिळेल का? आणि माझ्या ह्या अवताराची चिरस्मृति जर कांहीं राहिली नाहीं, तर पुढील अवतारांत तरी माझी जाणीव यांना कशी रहाणार! त्या वेळीं मी यांना वेगळाच भासेन व माझे भक्त ही वेगळेच भासतील! पण एवढी जाणीव जर प्रत्येक भक्त ठेवील, तर मग हें कलियुग कसलें?

**मीः**—मग आतां मी काय करावें असें तुमचें म्हणणें आहे!

**बाबाः**—कांहीं नाहीं, बिगि बिगि मी जें काय बोललों ते लिहून 'लीले'कडे पाठवून दे म्हणजे झालें!

**मीः**—बाबा, ही आफत मला कशाला? उगीच त्यापासून मी तुमच्या भक्तांच्या रोषास मात्र पात्र होईन.

**बाबाः**—तुझ्या गुरूची आण आहे बघ न लिहिशील तर! पोरांनीं वटवट किती करावयाची: आपलें सांगितलेलें उगिमुगि करावें: पुढचें मी पाहून घेईन!

**मीः**—बाबा, तुम्हीं तरी बरेच दिसतां गत्य कीं हो! तुम्हीं आलांत तो दवा घ्यावयाला का मला हा दंड द्यावयाला? तुमचे भक्त दिलेत सोडून आणि मला धरला बेठोला, होय! लौकिक दृष्ट्या मी कांहीं तुमचा भक्त नाहीं. संसारांत तर पूर्ण जखडून आहे. व्यवसायामुळें माझी अक्षरशः त्रिस्थळी रोज धिंड निघते आणि त्यांत तुम्हीं हे असे माझ्या बळि बळि गळीं पडतां! याला काय म्हणावें!

**बाबाः—'अल्लामियाची करणी'**

**मीः— आणि तुर्वतींत वाणी॥''**

**बाबाः**—बरें बरें, आतां चावटी बस कर, आणि उगिमुगि झोप पाहूं! मी तुला थापटतों बघ!

—आणि येथें मला जागृति आली! व पुनः तोच प्रश्न मला भेडसावीत आहे कीं,

**'हें स्वप्न कीं दृष्टांत?'**

जय दत्त

# श्रीसाईलॉज

शके १८२२ चैत्र कृ. ४ च्यां दिवशीं गुरुवार रोजीं ज्या नव भक्तांना श्रीसद्गुरु साईबाबा या योगी पुरुषाच्या चरणांचे रज मस्तकाला लागून कै. नारायण गोविंद ऊर्फ नानासाहेब चांदोरकर यांच्या प्रेरणेनें गुरुवार ता. २८ एप्रिल सन १९१० रोजीं दर्शन झालें, त्या नवभक्तांनीं नानासाहेब चांदोरकरांच्या सूचनेप्रमाणें मुंबई येथें जुन्या हनुमान गल्लींत रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान यांच्या घरीं श्रींची दर गुरुवारीं रात्रीं उपासना-आरति-पोथीवाचन व भजन करण्याकरितां श्रीसाईलॉज स्थापिला व त्याचा उद्‌घाटन-समारंभ व श्रीसाईबाबा यांच्या तसबिरींची प्राणप्रतिष्ठा ह. भ. दासगणूमहाराज यांनीं ता. २ जून १९१० रोजीं केल्यानंतर कीर्तन करून समारंभाचा समारोप केला.

आम्ही नऊ जण मुंबईहून निघण्यापूर्वीं कै. नानासाहेब चांदोरकर यांनीं आम्हांस सुचविलें कीं, शिर्डीस पोंहचल्यानंतर पहिल्यानें रावबहादुर साठे ( हल्लीं कै. श्री. रामकृष्ण श्री. नवलकर वकील यांचा ) यांच्या वाड्यांतील श्री निंबाचें दर्शन घेऊन त्यास प्रदक्षणा घालून नंतर श्रीसाईबाबा यांच्या दर्शनास जावें. त्याप्रमाणें आम्हीं केलें.

आम्ही शिर्डी येथें सकाळीं पोहचण्यापूर्वीं श्रीसाईबाबा कै. भाऊसाहेब दीक्षित यांस म्हणाले कीं, आज नाना ( कै. चांदोरकर यांना श्री. साईबाबा नाना या नांवानें संबोधीत असत ) येणार आहे. श्रीसाईबाबांचें बोलणें असेंच नेहमीं लाक्षणिक असे. कै. दीक्षित यांना आम्ही शिर्डी येथें गेल्यावर सर्व हकीकत सांगितली, तेव्हां त्यांना श्रीसाईबाबांच्या सकाळच्या बोलण्याची आठवण होऊन त्याचा अर्थ कळला कीं नाना-साहेबांनीं पाठविलेली मंडळी आज येणार आहेत; म्हणून नाना येणार असें श्रीसाईबाबा यांनीं म्हटलें.

पहिल्या नऊ जणांना श्रींचें दर्शन झालें ते:–

१ श्री. रामराव वि. प्रधान
२ ” आनंदराव शां. प्रभाकर
३ ” द्वारकानाथ वि. प्रधान
४ ” सुंदरराव दी. नवलकर
५ ” कृष्णराव रा. ब्रह्मांडकर
६ कै. श्री. भास्करराव पु. इन्जीनिअर
७ ” ” नारायण वि. प्रधान
८ ” ” दिनकर रा. ब्रह्मांडकर
९ ” ” कमलाक्ष वि. प्रधान

त्या दिवशीं कै. श्री हरि सीताराम दीक्षित शिर्डी येथें होते, त्यांनीं या सर्वांना दासगणूकृत अर्वाचीन भक्तलीलामृतांतील श्रीसाईबाबांसंबंधीं अध्याय ३१।३२।३३ हे वाचून दाखविले.

रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान, मोठाभाई बा. वेलकर, श्री. गणपतराव व मो. कोठारे, कै. श्री. वामनराव ज. व्यवहारकर, कै. श्री. शामराव स. प्रधान यांना लॉजचे सभासद नंतर करण्यांत आलें. या वरील नऊ जणांना प्रथम कै. श्री. नारायण गो. चांदोरकर यांच्या एकाच रात्रीच्या सहवासानें श्रीसाईबावांच्या दर्शनाचा लाभ झाला.

लॉज स्थापन झाल्यापासून प्रथमचे नऊ सभासद दर गुरुवारीं रात्रीं श्रीसाई लॉजमध्यें सहकुटुंब जमून श्रीची आरति, प्रसाद व भजन करून घरीं परत जात. असा क्रम सन १९२० पर्यंत सुरळीत चालला होता. नंतर कांहीं मंडळी मुंबई सोडून बाहेर-गांवीं गेल्याने नंतर एकत्र जमण्याचें होईना. या लॉजमध्यें कांहीं ठराविकच सभासद करण्यांत येत होते. म्हणून जास्त सभासद करण्यांत आले नाहींत. त्यांत नारायण महादेव ठोसर हल्लींचे नारायणस्वामी, वाई, हेही कांहीं दिवस सभासद होते. ते पहिले दिवस फार फार आनंदानें गेले. त्या दिवसांची अद्याप सर्वांना आठवण होते. ठोसर नाना ऊर्फ हल्लींचे नारायणस्वामी, यांच्या मधुर कोमल आवाजानें व कै. वामनराव ज. व्यवहारकर यांच्या प्रेमळ भजनानें भजनाला रंग येऊन सर्व तल्लीन होत असत. कै. नाना-साहेब चांदोरकर केव्हां केव्हां लॉजमध्यें येऊन त्यांचा भगवद्गीतेंतील आवडता श्लोक

तद्विद्धी प्रणिपातेन् । परि प्रश्नेनसेवया ॥
उपदेक्षंति तेज्ज्ञानं । ज्ञानीन स्तत्वदर्शिनः ॥ भ. गी. अ. ४, श्लोक ३४ वा.

ज्याबद्दल श्रीसाईसच्चरित अ. ३९ यामध्यें श्रीसाईबाबांनीं त्या श्लोकाचा अर्थ काय म्हणून त्यानां विचारून समजावून दिला होता, त्यावर प्रवचन व साईबाबांच्या शिकवणुकीवर प्रवचन करीत असत. एकदां पुणे येथील हल्लींचे महाराष्ट्र स्टोअर्सचे मालक श्री. नुलकर, यांनीं त्यांच्या कॉलेजांतील मंडळीसह येऊन भजन केलें होतें. बरेच श्रीसाई भक्त जरी सभासद नव्हते, तरी ते श्रीसाईलॉजमध्यें पाहुणे म्हणून दर्शनास येत असत. अशा रीतीनें श्रीसाईलॉज श्रीची उपासना करीत असे व तो लॉज चैत्र कृ. ४ हा दिवस लॉज-डे म्हणून पाळीत. त्या दिवशीं सर्व सभासद रात्रीं एकत्र जमून श्रींची आरति करीत व नंतर श्रींचा प्रसाद म्हणून भोजन होत असे. भोजनास पाहुणे मंडळी कै. नानासाहेब चांदोरकर व कै. हरि सीताराम दीक्षित येत असत.

दर गुरुवारीं भजनाकरितां लॉजनी मुद्दाम कै. रामराव गणपतराव देसाई झावबा, ज्यांनीं श्रीसाईचें दर्शन घेतलें होतें, त्यांजकडून तयार केलेलीं पदें श्रीसाईलीलेच्या वाचकांना विशेषें करून श्रीसाईभक्तांना पसंत पडतील म्हणून तीं श्रीसाईलॉजच्या ऑ. चिटणीसांच्या परवानगीनें खालीं देण्यांत येत आहेत.

---

# नमन

## १ पद (चाल--करुयां आपण प्रणति तयाला० )

उठवू भवी निज लाभ जनाला । हाच खरा निज लाभ जनाला ॥
साई पदा करुनी नमनाला । अर्पित जो सुख दान मनाला ॥
रामरसाचा गोकुळ काला । साइ लॉज जमे हर्दि सेवायाला ॥

## २ पद (चाल—नशिब फिरलें० )

सहज असले । श्री साईगुरुवर दिसले ॥
हृदयांत चरण ते ठसले । मग भान भवाचें कसलें ? ॥
अढळपद वसलें । श्रीसाई गुरुवर दिसले ॥ १ ॥
( चाल ) वेदांतादिक सर्वही धुंडिती जे विज्ञान ।
शिर्डी ग्रामी तें मिळे साईलॉजास्थान ॥
हंसत हंसले । तोऱ्यांत इतर जन फसले ॥ २ ॥ श्रीगुरु. ॥

## ३ पद ( चाल—झाली ज्याची उपवर दुहिता० )

इतुकें देई साइराज । सतत तुझिया साइलॉजा ॥
तुला पुजावें तुजला गावें । करितां नच तो गाजावाजा ॥
तव चरिताचें पारायण ही । व्हावें भावें सोहं बीजा ॥
त्वन्मर्तीची ध्यानधारणा । ती साधावी निजहितगुजा ॥
"साई आई साई भाई । सर्वहि कांहीं साई माझा "
अंतर्मुख ही वृत्ति व्हावी । जननिंदेच्या सोडुनी काजा ॥

## ४ पद (चाल—बघुनि त्या भयंकर भूता०)

मानवी देहगांवींची चावडी मनोमूमीची ॥
स्नेहाच्या लावुनी कोडया उजळली सदाची साची ॥
मोदाश्रुपंक्तिच्या चवऱ्या ढाळुनी तुझ्या वर भारी ॥
नामाच्या निर्मळ गजरी मिरविती तुझी ही स्वारी ॥
ही भक्ति सुंदरी दारीं आरती तुला ओवाळी ॥
प्रेमाच्या निजवुनि रोजें धूळ घे तुझी निज भाळीं ॥
भोगुनी इथें विश्रांती सर्वदा नतां सुख देई ॥
गुरुराया साईबाबा लॉज हे मागुन घेई ॥

## ५ पद ( चाल—टाकिला यानें यानें यानें डौल पहिला०)

पंच भूतानि भूतानि तनू मोठी । घडविली मशिद तुझ्यासाठीं ॥
तिचा तो घ्यावा घ्यावा त्वां ताबा । येऊन गा साईबाबा ॥
असे ज्यावर ती वरती निजसत्ता । हाणि तो त्यास कोण लत्ता ॥
करुनी हलगर्जी अर्जी नच पुसतां । होईल दुसऱ्याची मत्ता ॥
विषय हे टपती असती जे मख्ख । हिराया सर्व तुझे हक्क ॥
मनोरथाची रायाची त्यांस फूस । मांडिली तर्यीं नासधूस ॥
तुझीं तूं घेई साई महाराज । विनवितों हे साई लॉज ॥

---

# शिर्डीवृत्त

## जानेवारी १९३७ चें शिर्डीवृत्त

ता. २१।६।३६ ते ता. २५।६।३६ पर्यंत श्री. साईबाबा यांच्या समाधींतून सन १९३५ सालाप्रमाणें पाणी वाहत होतें. याचें कारण काय याबद्दलचा तपास अजूनपर्यंत लागला नाहीं.

### शिर्डी संस्थान भक्तमंडळ

श्री. नागेश आत्माराम सावंत हे शिर्डी संस्थानच्या कायम निधीस वेळोवेळीं एकंदर रकम रु. ५०१ दिली असल्यानें कमिटीनें त्यांना ता. २३।१०।३६ च्या सभेंत भक्तमंडळाचे 'आश्रयदाते' या सभासदांच्या सदरांत दाखल केलें आहे.

श्री. गणपंतराव मोरेश्वर कोठारे, मुंबई; श्री. विष्णु गोविंद देव, संगमनेर व श्री. शामराव भास्कर कंटक, मुंबई यांनीं प्रत्येकीं कायम निधीस रु.१०० देऊन भक्त-मंडळाचे तहाहयात समासद झाले आहेत.

### ऑ.चिटणीसांकडे आलेला सभामंडप निधि ता.१।१।३७ ते ता.३१।१।३७

सौ. कमलाबाई श्रीराम चौबळ, खार, रु. ५; श्री. हरि गोपाळ सकपाल, वांद्रें, रु. २५; श्रीमती जनाबाई नारायण सुर्वे, वांद्रें, रु. ५.

### कै. श्री. नीलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे

कळविण्यास दुःख वाटतें कीं श्रीसाईबाबा यांचे एक जुने भक्त श्री. नीलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे हे श्रीसाईचरणीं लीन झाले. त्यांचे लेख श्रीसाईलीलेंत येत असत. लेखकाची व त्यांची गांठ सन १९१० सालीं कै.लक्ष्मण नुलकर, रिटायर्ड सबजज्ज शिर्डी येथें होते, त्या वेळीं पडली होती.

### पेट्यांचें उत्पन्न

| श्री समाधि मंदिरामधील | श्री द्वारकामाई मधील |
|---|---|
| ता. १ जानेवारी ३७ रु. १९०--१--९ | रु. ७--२--३ एकंदर रु. १९७--४--० |

### सभामंडप

हल्लींच्या अपुऱ्या झालेल्या सभामंडपाच्या पूर्वेकडील जागा रु. ९०० या किंमतीस कै अण्णा चिंचणीकर यांच्या मृत्युपत्राप्रमाणें अण्णा चिंचणीकर ट्रस्टकडून दरसालची तीन

चतुर्थांश नफ्याची रक्कम शिर्डीसंस्थानास देण्याची असलेल्या रकमेतून खरीदी केली त्या जागेचे रजिस्टर कागद करण्यास वगैरे खर्चाकरितां रु. ६० झाला आहे. मिळून रु. अण्णा चिंचणीकर टस्टूनीं दिले आहेत. बाकीचे रु. १२९४--१०--६ त्या ट्रस्टकडून १८५७ अखेर येणारी रक्कम त्यांनीं अद्याप दिली नसल्यानें शिर्डी संस्थानास ती लावतां येत नसून संस्थानचें नुकसान होत आहे.

## संस्थान वृत्त

खालील प्रमाणें माझा राजीनामा मी देत आहें. आज सुमारें सात वर्षे श्री बाबांची वेडीवांकडी सेवा मीं केली, ती मान्य करून घेतील अशी त्यांच्या चरण प्रार्थना करितों. श्रीसाईभक्तही माझ्यापासून त्यांचा कांहीं अपराध घडला त्याबद्दल त्यांनीं क्षमा करावी. श्रीसाईबाबा योग आणतील, तेव्हां आपणास सर्व बद्दलच खुलासा निराळ्या पुस्तकरूपानें प्रसिद्ध करून देण्यांत येईल.

संस्थानचा गवई त्यांच्या एक दिवसाच्या जरूरीच्या कामास पुण्यास गले तेथून नंतर ते शिरवळ येथें श्रीदत्तजयंतीकरितां श्री. बा. वि. देव यांच्या आमंत्रण गेले होते.

---

# राजीनामा

# श्रीसाईबाबा

शिर्डी संस्थान कमिटीचे अध्यक्ष व इतर सर्व सभासद यांसी सा. न. वि.

वर्ष १३ शके १८५८ चा चैत्र,वैशाख व जेष्ठ या महिन्यांचा श्रीसाईलीला मा काच्या जोड अंकाचें पृष्ठ २५ या वरील शेवटच्या पांच ओळींतील मजकूर निद आणल्याप्रमाणें आतां संस्थानकमिटीच्या परिस्थितीचें वातावरण कोणत्या दिशे चाललें आहे हें ऑ. चिटणीस यांस सभा बोलवण्याबद्दल रीतसर (Requisiti मागणी न करितां कमिटीच्या सहा सभासदांच्या कृतीनें व सह्यांनीं ता. ९।२।३५ पत्रकानें शिर्डी येथें ता. २१।२।३७ रोजीं स्वतःच सभा बोलवली आहे, ह्या कमि सभेच्या कार्यक्रमावरून पूर्णपणें शाबीत होत आहे.

ऑ. चिटणीस यांनीं ऑ. खजिनदार रा. रा. सामंत यांस आतांपर्यंत दोन-तीन वेळां विचारलें होतें कीं, मागील सभेचा ठराव नं. ४८ ( ब ) ता. २८।१०।३६ प्रमाणें शके १८५६ व १८५७ चे आढावे तयार झाले आहेत किंवा नाहींत त्याबद्दल कळवावें; म्हणजे ते तयार असल्यास, संस्थानचे ऑ. ऑडिटर यांजकडून तपासून घेऊन ते रीतसर कमिटीपुढें मांडण्याकरितां कमिटीची खास सभा त्या ठरावाप्रमाणें बोलावितों. असें असतां ऑ.खजिनदार यांनीं त्याबद्दल त्यांचें ता. २६।१।३७ चें पत्र मिळालें.२८।१।३७ ला जें मला तें पाठवीपर्यंत कांहीं एक न कळवितां आतां स्वतः इतर पांच सभासदांबरोबर वरील पत्रकावर सही करून कळवीत आहेत कीं, आढावे तयार करण्याकरितां ऑ. चिटणीस कांहीं कागदपत्र देत नाहींत, म्हणून खालीं लिहिलेल्या खुलाशाखेरीज (म्हणून खरेपणा कोठें आहे व खोटेपणा कोठें आहे ( Viz. Suggestion of falrehood and suppression of truth) हें कोणती बाजू करीत आहे) ह्याबद्दल वगैरे, तूर्त इतर गोष्टी उघडकीस न आणतां मी आपल्या संस्थानच्या ऑ. चिटणीसाच्या जागेचा, कमिटीच्या सभासदाचा व श्रीसाईलीला मासिकाच्या संपादकाचा राजीनामा या सक्युंलर पत्रानें देत आहें. कारण जेथें ऑ. चिटणीसाचा अधिकार बळकावला जातो, तेथें ज्याला स्वाभिमान आहे व सत्याची व न्यायाची चाड आहे तो काम करण्यास तयार होणार नाहीं.

हा राजीनामा संस्थान कमिटीनें स्वीकारून संस्थानच्या कागदपत्रांचा चार्ज मला आधीं कळवून घेऊन जावा. क. लो. अ. ही. वि.

श्रीसाईभुवन
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट
मुंबई, ता.१८ फेब्रुवारी १९३७

आपला नम्र सेवक
सही **सुंदरराव दी. नवलकर**

## खुलासा

मागील कमिटीच्या सभेचें टिपण माझ्या आजारीपणामुळें मी अशक्त असल्यानें श्री. गो. का. गाडगीळ यांनीं माझ्याकरितां घेण्याचें काम कृपा करून केलें. त्या टिपणांत मीं सभेपुढें ज्या गोष्टी सांगितल्या व कांहीं उघडकीस आणिल्या, त्या सर्व त्यांनीं टिपून घेतल्या नव्हत्या त्याबद्दल श्री. गाडगीळ हे सभेचें टांचण तयार करण्याकरितां माझ्याकडे येऊन तीन दिवस राहिले होते, तेव्हां त्यांच्या नजरेस ही गोष्ट आणिली. ते म्हणाले कीं, तुम्हां सर्व खुलासेवार टिपण लिहून कांहीं सभासदांचें वर्तन उघडकीस आणतां काय ? मी म्हणालों, जें जें सभेपुढें आलें, तें तें सर्व सभेच्या टांचणांत आलें पाहिजे. येथें व्यक्तीचा प्रश्न नाहीं. तेव्हां ते म्हणाले कीं, तुम्ही हें टांचण मागें मी माझ्या एका ठरावाबद्दल खुलासा करून एका सभेत टांचण जसें सुधारून घेतलें, त्याप्रमाणें तुम्हां पुढील सभेंत सुधारून घ्या. मी म्हणालों, तुमची गोष्ट निराळी होती. तें टांचण आधीं लिहून गेलें होतें, तें तुम्ही नंतर सभेंत सुधारून घेतलें. आतां तशी गोष्ट नाहीं. आतां टांचण खुलसेवार न लिहितां नंतर सभेंत खुलासेवार करून घ्या. हा मार्ग बरोबर नाहीं. तेव्हां ते म्हणाले कीं, तुम्हास योग्य दिसेल त्याप्रमाणें करा. म्हणून त्या सभेच्या टांचणाचा नीट बोध व्हावा म्हणून व जेथें जेथें टांचणाची सांखळी तुटली होती, तेथें तेथें ती जुळवून तें टांचण नेहमीप्रमाणें लिहिण्यांत आलें. सांवळा-गोंधळ व अनागोंदीच्या हिशोबाबद्दल मीं जें कांहीं सभेंपुढें मांडलें होतें, त्याचा सभेच्या टांचणांत उल्लेख केल्यामुळें माझा हा रीतसर मार्ग कांहींसा पसंत नाहीं, त्याबद्दल इलाज नाहीं.

## श्रीची चावडी

श्रीची चावडी पूर्ण दुरुस्त करण्याकरितां सुमारें रु. ४०० पर्यंत कमिटीनें सन १९२९ सालीं मंजूर केले होते. त्याचा हिशेब सन १९३२ सालीं देण्यांत आला. त्यानंतर दोन तीन वर्षांनंतर म्हणजे सन १९३४ पासून चावडी पुन्हा दुरुस्त करण्याबद्दल आग्रह होऊं लागला. ती दुरुस्त करून तीस एवढी मोठी रक्कम सुमारें रु. ४०० पर्यंत खर्च करण्यांत आली असतां ती आतां पडावयाच्या स्थितींत आहे याबद्दल आश्चर्य वाटतें.

## श्रीसाईभक्तांस विनंती

यापुढें श्रीसाईभक्तांनीं वर्गणी वगैरे पाठविणें ती माझ्याकडे न पाठवितां संस्थानचे ऑ. खजिनदार रा. रा. रामचंद्र रा. सामंत, ४५ टर्नर रोड, वांद्रें, मुंबई २०, या पत्त्यावर पाठवावी व संस्थानचा पत्रव्यवहारही त्यांजबरोबर करावा.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे. जानेवारी महिन्यांत श्रीसाईभक्त दर्शनाकरतां येऊन गेले.

श्रीसाईभुवन,
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट
मुंबई; २ ता. १८फेब्रुवारी १९३७

सुंदरराव दी. नवलकर,
ऑ. चिटणीस
शिर्डी संस्थान कमिटी

---

# श्री साईनाथ

## पत्रक नं. १

श्री शिर्डी संस्थानकडून वेळोवेळीं, श्री. बाबरे मिळकतीचे खर्चासाठीं उसनवार व कर्जाऊ घेतलेल्या व परत दिलेल्या रकमांचा हिशेब.

**( शके १८४५-४६ ते १८५७-५८ पर्यंत )**

**( सन १९२३-२४ ते सन १९३५-३६ पर्यंत. )**

| जमा ( घेतले ) | तारीख. | खर्च ( परत केले ) | तारीख. |
|---|---|---|---|
| ३०७-०-० | ४-३-२३ | ३०७-०-० | २०-८-२४ |
| १५४-१५-६ | ५-६-२५ | ४-१५-६ | ५-६-२५ |
| १६०-०-० | १६-४-२६ | १३०-०-० | ९-६-२६ |
| | ३०-४-२६ | १५०-०-० | २८-९-२७ |
| | २-६-२६ | | |
| २१११-१३-० | ३१-१०-२७ | ६६८-५-६ | १३-६-२८ |
| ५-२-९ | ०-०-३७/२८ | ३०-०-० | |
| ११६-१२-० | १२-११-२९ | | |
| १०५-०-० | २२-७-३० | ५००-०-० | २६-१-३० |
| | २६-७-३० | १६५-२-० | २२-२-३१ |
| | १५-८-३० | ८००-०-० | |
| | २-१२-३० | | |
| २५०-१२-० | १४-९-३१ | ०-०-० | — |
| | १-१२-३१ | | |
| | ८-१-३२ | | |
| | ६-२-३२ | | |
| १००-०-० | १८-४-३२ | ०-०-० | — |
| १००-०-० | १८-९-३३ | ०-०-० | — |
| २०३-२-३ | ३१-१-३४ | ०-०-० | — |
| | १३-२-३४ | | |
| २५-४-० | २१-९-३४ | १२९४-१०-६ | ९-९-३५ |
| ३६३९-१३-६ | | ४०५०-१-६ | ३०-९-३५ |
| | | -३६३९-१३-६ | ८-११-३५ |
| | | ०४१०-४-० | ५-१-३६ |
| | | | १३-२-३६ |
| | | | ६-३-३६ |

ही ४१०-४-० ची जास्त दिलेली रक्कम २१०० रु. वरील ०-८-० शें. प्रमाणें व्याजाची आहे. ३६३९-१३-६ यांत २१०० कर्जाऊ व १५३९-१३-६ उसनवार आहेत.

ठाणें.
गुरुवार. १०-९-३६

बाळकृष्ण विश्वनाथ देव.
बाबरे मिळकत व. शि. सं. विश्वस्त.

# श्रीसाईनाथ

## पत्रक नंबर २

श्री. कै. आण्णासाहेब दाभोळकर शि. सं. खजिनदार व श्री. कै. बाबासाहेब तर्खड शि. सं. खजिनदार यांच्याकडून वेळोवेळीं, श्री बाबरे मिळकतीच्या खर्चासाठीं उसनवार रकमा तसलमात म्हणून घेतल्या त्या

### शके १८४५–४६ ते १८५७–५८ पर्यंत
### ( सन १९२३–२४ ते १९३५–३६ पर्यंत )

| | जमा | तारीख | परत दिल्या. | तारीख |
|---|---|---|---|---|
| | ३०७–०–० | ४–३–२३ | ३०७–०–० | २०–८–२४ |
| | १५४–१५–६ | ५–६–२५ | ४–१५–६ | ५–६–२५ |
| १६० | ५०–०–० | १६–४–२६ | १३०–०–० | ९–६–२६ |
| | ८०–०–० | ३०–४–२६ | | |
| | ३०–०–० | २–६–२६ | १५०–०–० | २८–९–२७ |
| | ११–१३–० | ३१–१०– | ३०–०–० | १३–६–२८ |
| | ५–२–९ | ०–०३२८ | १६५–२–० | २२–२–३१ |
| ११६–१२ | ६–१०–० | १२–७–२९ | — | — |
| | २०–२–० | | | |
| | ३०–०–० | १०–११–२९ | — | — |
| | ६०–०–० | १२–११–२९ | | |
| १०५ | ५०–०–० | २२–७–३० | — | — |
| | ५०–०–० | १८–८–३० | | |
| | ५–०–० | २–१२–३० | — | — |
| २५०–१२ | १०–०–० | १४–९–३१ | — | — |
| | २४–४–० | १–१२–३१ | | |
| | ५०–८–० | ८–१ ३२ | — | — |
| | १६६–०–० | ६–२–३२ | | |
| | १०० ० ० | १८–४–३२ | — | — |
| | १०० ०–० | १८–९–३३ | | |
| २०२-२-३ | १०१–०–० | ३१–१–३४ | | |
| | १०२–२–३ | १३–२–३४ | — | — |
| | २५–४–० | २१–९–३४ | | |
| | १५३९–१३–६ | | | |

७८७—१–६ सन १९३१ पर्यंत परत दिली
७५२–१२–० बाकीचें देणें १९३४ अखेर
१५३९–१३–६

टाणें. गुरुवार १०–९–३६ ( सही ) बाळकृष्ण विश्वनाथ देव
बाबरे मिळकत व शि. सं. विश्वस्त.

# श्रीसाईनाथ

## पत्रक नंबर ३

कै. श्री. दामोदर घनःश्याम बाबरे ऊर्फ चिंचणकर यांनीं श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबा यांच्या चरणीं समर्पण केलेल्या मिळकती गहाणांतून सोडविण्याकरितां श्रीशिर्डी संस्थानकडून घेतलेल्या कर्जाऊ रकमेच्या फेडीचा हिशेब. व्याज दरमहा दर शेंकडा-०-८-० प्रमाणें

| | | |
|---|---|---|
| मद्दल | २१००-०-० | ३१-१०--२७ रोजीं घेतले. |
| व्याज | -७८-०-० | १३--६ २८ पर्यंतचें (७ म. १३ दिवसांचें). |
| वसूल दिला तो | २१७८-०-० | |
| वजा. | -६६८-५-६ | वरील तारखेस ( १३-६-२८ रोजीं. ) |
| मुद्दल | १५०९-१०-६ | |
| व्याज | १४५-१२-० | २६-९-३० पर्यंतचें (१९ म. १[illegible] दिवसांचें) |
| | १६५५-६-६ | |
| वसूल वजा | -५००-०-० | वरील तारखेस ( २६-९-३० रोजीं ) |
| मुद्दल | ११५५-६-६ | |
| व्याज | ६८-८-० | २२-१-३१ पर्यंतचें (११ म. २६ दिवसांचें) |
| | १२२३-१४-६ | |
| वसूल वजा | -८००-०-० | वरील तारखेस ( २२-१-३१ रोजीं ) |
| मुद्दल | ४२३-१४-६ | |
| व्याज | ११८-०-० | ९-९-३५ पर्यंतचें (४ व ७ म.१७ दिवसांचें) |
| | ५४१-१४-६ | |
| वसूल वजा | -३२६-०-० | वरील तारखेस ( ९-९-३५ रोजीं. ) |
| मुद्दल | २१५-१४-६ | |
| वसूल वजा | ३००-०-० | ३०-९-३५ रोजीं ( २१ दिवसांचें व्याज |
| | ८४-१-६ | धरलें नाहीं. कारण तें किरकोळ आहे.) |
| ( व्याजा सुद्धां मुद्दल | १७६-७-० | |
| रक्कम फिटून) जास्त | २६०-८-६ | ८-११-३५ रोजीं वसूल दिला |
| रकमा दिल्या त्यांची | | |
| बेरीज ७५२-१२-० | ९०-८-० | ५-१-३६ ,, ,, ,, ,, |
| आहे. ह्या रकमा देऊन | ३५१-०-६ | ,, ,, |
| सन १९३४ साल- | १९०-११-६ | १३-२-३६ ,, ,, ,, ,, |
| अखेर उसनवार रकमे- | ५४१-१२-० | ,, ,, |
| पैकीं राहिलेली बाकी | | |
| वाळून दिली. | २११-०-० | ६-३-३६ ,, ,, ,, ,, |
| | ७५२-१२-० | |

ठाणें.
गुरुवार १०-९-३६

**(सही) बाळकृष्ण विश्वनाथ देव**
**बाबरे मिळकत व शि. सं. विश्वस्त.**

# श्रीसाईनाथ

# पत्रक नंबर ४

## १२९४-१०-६ रकमेचा तपशील.

( नंबर १ च्या पत्रकांत खर्चाच्या बाजूकडे दाखविलेली शेवटची रक्कम )

**कर्ज**

| कर्ज | उसनवार |
|---|---|
| मु. २१००—०-० ३१-१०-२७ व्याज ०—८-० शे. प्रमाणें | |
| व. -६६८—५-६ १३—६-२८ ७८—०-० १३-६-२८ | |
| मु. १४३१-१०-६ पर्यंतचें. | नंबर २ चे पत्रकांत |
| क. -५००—०-० २६—९-३० १४५-१२-० २६-९-३० | दाखविल्याप्रमाणें |
| मु. ९३१-१०-६ पर्यंतचें. | उसनवार घेतल्लेल्या |
| व. -८००—०-० २२—१-३१ | रकमेपैकीं सन |
| १३१-१०-६ सन १९३५ अखेर मुदलापैकीं बाकी. ६८—८-० १२-१-३१ पर्यंतचें. | १९३४ अखेर राहि- |
| ११८—०-० ९-९-३५ पर्यंतचें. | लेली बाकी १९३५- |
| | ३६ सालांत दिली ती. |
| ४१०—४-० सन १९३५ अखेर व्याज दिलें तें. | ७५२-१२-० |

१३१-१०-६+४१०-४+७५२-१२=१२९४-१०-६

**टीपः—** ( १ ) ही शेवटची १२९४-१०-६ ची रक्कम बावरे मिळकतीच्या उत्पन्नांतून शिर्डी संस्थानास १९३५-३६ सालांत दिली असल्यामुळें आतां बावरे मिळकत शिर्डी संस्थानच्या कर्जातून व उसनवारींतून पूर्णपणें मुक्त झाली आहे व अशाबद्दलचा शिर्डी येथें ता. २६-१०-३६ च्या मोठ्या सभेंत ठराव पास होऊन बावरे मिळकतीच्या विश्वस्तांना व्याजासह कर्जफेडीची व उसनवार फेडीची वरील ठरावाच्या प्रतीरूपानें पावती ( discharge ) मिळाली आहे.

( २ ) बावरे मिळकतीच्या विश्वस्तांनीं १६-९-३६ रोजीं डहाणू येथें केलेल्या ठरावांतील ११ व्या कलमांतील विनंतीप्रमाणें वरील २६-१०-३६ रोजीं शिर्डीस भरलेल्या मोठ्या सभेनें सर्व व्याज ( दरमहा दरशेंकडा १ रु. प्रमाणें ) माफ न करतां सर्व रकमेवर दरमहा दरशेंकडा ०-८-० आणे प्रमाणें केलेली व्याजाची आकारणी मंजूर केली आहे.

| | |
|---|---|
| ठाणें<br>गुरुवार १०-९-३६ | ( सही ) बाळकृष्ण विश्वनाथ देव<br>बावरे मिळकत व शि. स. विश्वस्त. |

# श्रीसाईसच्चरित अध्यात्म निरीक्षण

( लेखकः–**सुमनसुंदर** )

## अध्याय २ रा

गताध्यायनिरीक्षणांतीं परमात्मा श्रीसाईगजानन शिरडींत प्रकटला. तो 'विलासी ईश्वर' आहे; तो 'एकाकी न रमते'–त्याला एकलकोंडेपणा रुचत नाहीं. तर त्याला "बहुस्याम' ऐशिया प्रीनीं । आवडूं लागे दुजियाची संगती ॥ म्हणून त्यानें सिद्धिबुद्धि या दोन रमणी निर्माण केल्या. तो 'दोन बायकांचा दादला झाला' व त्यांपासून अखिल चराचर झालें. ह्या दोन आदिमाता होत व त्या स्वभावतःही सवती आहेत. 'बुद्धिमाता' जीवात्म्यांना त्यांच्या पित्याची 'परमात्म्याची' भेट करून देण्याचा प्रयत्न करते, तर 'सिद्धिमाता'–माया–जीवशिवाची फारकत करण्यांतच समाधान मानते व लेकरांना आपल्या कह्यांत ठेवते !

हें अध्यात्मिक 'निरीक्षण' आहे. आपण मुमुक्षु आहोंत. आपलें ध्येय गांठण्याचा "महाजनो येन गतः स पन्थः ॥' आहे. ज्ञानी लोक त्या सिद्धि महामायेला ती 'मा--या' म्हणजे फोल आहे हें जाणून दुरूनच 'साष्टांग नमस्कार' करतात व आपणही तो प्रथमाध्यायनिरीक्षणांत केला आहे.

आतां आपणांस 'बुद्धि'मातेला अभिवादन करण्याचें आहे. "ही बुद्धि म्हणजे समुद्रांत बुडणाऱ्याला मिळालेली नौका होय !' (–श्री दत्त भार्गव संवाद प्र० २ ) ती प्रस्तुत अध्यायांत आपले दोन कर पुढें करून आपलें स्वागत करीत आहे "विचार" व "विवेक" हे तिचे दोन कर होत. तेव्हां आपण तिच्या या करपाशांत पडूं म्हणजे ती आपल्याला आपल्या पित्याची परमात्म्याची भेट करवील व आपण मुक्त होऊं ! !

श्री. माधवराव देशपांडे व कै. नानासाहेब चांदोरकर ह्यांना अनुक्रमें 'विचार' व 'विवेक' अशा भूमिका श्रीबाबांनीं आपल्या परिवारांत दिलेल्या आहेत. तेव्हां सच्चरितांत ह्यांचा प्रामुख्यानें उल्लेख आला आहे हें स्तुत्यच आहे. जेथें जेथें त्यांचा निर्देश येईल, तेथें तेथें मी त्यांच्या भूमिका विशद करीनच. प्रस्तुत त्यांच्या भूमिकेची ओळख यथासंदर्भ करून देतों !

**श्री. माधवराव देशपांडे**:--शामा--संस्कृतमध्यें 'शामन्' या शब्दाचा अर्थ Conciliation म्हणजे 'सख्यता जोडणें' असा आहे ! शामा हें 'शामन्' याचेंच रूप धरतां येईल. सख्यता कोण जोडतो ? तर 'विचार !'

"विचार हेंच सर्वांचें मूळ असून ब्रह्मपदाच्या गच्चीवर जाण्यालाही ही पहिली पायरी आहे. सुविचारावांचून कल्याण कोणचेंही कसें होणार ? ? विचार करणाराचाच सर्वदा जय होतो व त्यालाच सर्व इष्ट प्राप्त होतें. सुविचार हेंच सुखवृक्षाचें बीज आहे. यापासूनच सुखाचे अंकुर फुटतात. पुरुष विचारानेंच सर्वांत अधिक शोभतो:

विचार ज्यांना केव्हांही सोडून जात नाहीं, तेच धीर व तेच महात्मे होत. अविचारामुळेंच लोक नव्हे तें कर्तव्य डोक्यावर घेऊन नाचतात; पण तेच जर विचार करतील, तर त्यामुळेंच ते अनंत संकटांपासून मुक्त होतील; सारांश, लोकांना विचार हें फार उपयुक्त साधन मिळालेलें आहे. हा थोर विचार प्राप्त झाला, कीं मनुष्याच्या जीविताचें सार्थक झालें ! " (–श्री. द. भा. सं. प्र. २ )

—व शामाची भूमिका अशीच आहे. बाबा शिव व भक्त जीव यांची सांगड घालण्याचें काम शामाच करीत असे. 'शामा पुंडलिका'चें दर्शन घेतल्याखेरीज 'साईविठोबा' पावत नसे!

प्रस्तुत अध्यायांतही हेमाडपंतांनीं–

'मनांत उदेली वृत्ति । माधवरावांचे कानांवरती ॥ घातली--' २-४८ व 'तेच वेळी माधवरावांनीं । ...... । बाबा लागून पुसियेलें ॥' २-६६ व तेव्हांच--' कृपा उपजली साईसमर्था ॥ म्हणती 'लाहसील मनोरथा ॥' २-७२ कार्यभाग झाला !

"बाबा हे अण्णासाहेब म्हणती । ........................ ।
निर्विघ्न लेखन चालेना ॥" २--६७-७१

ह्या ओव्यांत श्री. माधवरावांनीं हेमाडपंतांचें मनोगत बाबांच्या कानीं घातलें आहे.- त्यांतील गूढार्थ फार उद्‌बोधक आहे. बाबांप्रमाणेंच माधवरावही फार मार्मिक कोटया करतात. ह्या ओव्यांचा भावार्थ असा:—

—देव जात्या भिकारी आहे: कारण भक्तामुळेंच त्याला देवत्व प्राप्त झालें. तो लाचारलेला आहे. दारोदारीं 'भक्ती'ची भीक मागत असतो. जो कोणी त्याला जी काय 'भक्ती'ची 'ओली कोरडी भाजी भाकरी' देईल त्यावरच 'खाउनी गुजारी काळ' तो आपलें देवत्व संभाळून आहे. नाहींपेक्षां 'मानला तर देव, नाहीं तर फत्तर !' भक्तच देवाला चढवितो व ( विरोधी ) भक्तच देवाला उतरवतो. देव आहे तसाच आहे ! ज्याची जशी भावना तसा त्याला तो दिसतो ! तेव्हां अशा देवाच्या कथा ह्या एका भक्ताला 'सुधापान' देऊन उन्मनी बनवितील, तर दुसऱ्यांना आणि मायेच्या आवरणामुळें ह्याच कोटींतील अधिक त्याच कथा 'सुरापान' देऊन उन्मत्त बनवितील व उपहासास पात्र होतील. मग अशा देवाच्या कथा लिहून फायदा काय ? का त्या लिहूंच नये ? तर त्या जरूर लिहाव्यात. त्यापासून जो फायदा सुधापान करून घेणारे आहेत ते घेतीलच; त्यांचा प्रश्न दुय्यम आहे ! पण ज्याला लिहिण्याची बुद्धि झाली, त्यांचा फायदा विशेष आहे ! कारण एक तर त्याला देव आहे ही भावना झाली, तो कोणी तरी आपल्याहून श्रेष्ठ व हितकर्ता आहे हें पटलें, म्हणजे त्याच्या अंगीं 'लीनता' आली व अशा देवाच्या कथा लिहाव्या, त्याची कांहीं तरी सेवा घडावी, हा सुविचार त्याला प्राप्त झाला. तो ब्रह्मपदाच्या गच्चीवर जाण्याच्या पहिल्या पायरीवर आला. तेव्हां देवा 'त्याच्या उद्धारार्थ' तुला आतां हें देवपण--लटकें कां होईना. पण स्वीकारलें पाहिजे. त्याला सुविचार झाला. तो 'हिरा' आहे! तेव्हां...-'या हिरियाला'।कोंदणी चढविला पाहिजे"॥ २–६९ त्याचा उद्धार करणें हें तुझें कर्तव्य आहे व तें तूं केलें पाहिजेस. तो एकदां भक्तिमार्गांत शिरला, तुला देव बनवून तो भक्त बनला, त्यानें आपलें काम केलें. आतां त्याला चरकांत घातल्याप्रमाणें पुढें खेंचून स्वस्वरूपीं मिळवून घेणें हिरियाला कोंदणांत बसविणें–हें काम तुझें आहे. तें तूं कर 'विना आपल्या कृपावलोकनें' निर्विघ्न लेखन चालेना "—

इतका त्यांत भावार्थ आहे. जीवशिवांची इतकी प्रेमळ पण अधिकारयुक्त वार्णानें सांगड, सुविचारावांचून दुसरें कोण घालूं शकणार नाहीं. येथें मजा ही आहे कीं, या हिरियाला कोंदणीं बसविला पाहिजे याच्यावर कोटी आहे. त्याचा संदर्भानुसार वाच्यार्थ घेतला, तर तो बाबांना अनुलक्षून निघतो. पण तत्त्वदृष्टया लक्ष्यार्थ घेतला, तर तो हेमाडपंतालाच समर्पक ठरतो. कारण बाबा जीवन्मुक्त म्हणजे कोंदणांत जडविलेला हिराच आहेत. त्यांना नव्यानें हिरा बनविण्याचा प्रश्नच नाहीं. प्रश्न आहे तो हिरा होऊं पाहणाऱ्या हेमाडपंताचा ! व तोच माधवरावांनीं अशा युक्तीनें सोडवून घेतला.

**"कथावार्तादि अनुभवांचा । संग्रह साचा करावा ॥" २-७५**

येथें वाच्यार्थानें 'कथा-वार्ता' शब्द महत्त्वाचा ठरतो; पण लक्ष्यार्थानें 'अनभवांचा' शब्द महत्त्वाचा आहे; कारण नुसत्या कथावार्तांचा संग्रह अनुभवाशिवाय व्यर्थ आहे. ती नुसती पोपटपंची होईल.।'पुस्तकी मुक्त केवळ तो ॥२-१५५. अनुभव हाच सर्वश्रेष्ठ आहे. बाळंतिणीच्या वेदना बाळंतिणीला कळणार व मातृसुख मातेलाच लाभणार. वांझोटीला त्याचें काय होय ! तसेंच अनुभवाशिवाय जें ज्ञान तें वांझोटें होय. ज्याला स्वात्मानुभव-- अपरोक्षज्ञान झालें, तोच मुक्त झाला. कोठलीही परीक्षा पास होण्याला आधीं तो विषय समजावून घ्यावा लागतो; जर विषयच माहीत नसेल, तर परीक्षा तरी कशाची देणार ? त्या विषयांचीं जीं पुस्तकें तें परोक्ष ज्ञान व तीं समजावून घेऊन अनुभवपूर्ण जें ज्ञान होतें, व ज्यांमुळें परीक्षा पास होते, तें 'अपरोक्ष ज्ञान'. व्यवहारांत पोपटपंची करून नोट्स घोकून— परीक्षा पास होतां येतें. पण अध्यात्मशास्त्रांत स्वानुभवाशिवाय परीक्षा पास होतां येत नाहीं, मुक्ति मिळत नाहीं व जन्म-मरणाच्या वाऱ्या चुकत नाहींत. तेव्हां कथावार्तांचा संग्रह जरूर करा. परोक्षज्ञान मिळवा. पण त्याच्या जोडीला अनुभव घ्या, नुसत्या कथावार्तांचा संग्रह करूं नका. तर कथावार्तादि अनुभवांचा संग्रह करा ! ! अशी हेमाडपंताच्या मिषानें प्रत्येक मुमुक्षूला श्रीबाबांची वाचा । 'अनुज्ञापनीं प्रवर्तली ॥ २-७५ व जो असें **अनुभवाचें** दप्तर ठेवील, । 'त्याला माझें पूर्ण सहाय' ॥ २-७६. त्याला मी माझ्यांत मिळवून घेईन. इतरांना नाहीं. म्हणजे 'आत्मज्ञान झाल्याखेरीज मोक्ष मिळत नाहीं,' ज्ञानादेवतु कैवल्यम् । हेंच बाबांनीं येथें अप्रत्यक्ष बजावलें आहे.

शिवाय दप्तर ठेवण्यापासून व्यावहारिक फायदाही असतोच. दिवसापोटीं प्रतिक्षणीं कित्येक विचार आपल्या मनांत येतात व जातात; पण त्यांतील कृतींत किती उतरतात ? मनांत आपण खूप मांडे खातों. पण कृतींत भाकरी मिळण्याची पंचाईत. आत्मज्ञानाचेंही तसेंच आहे. आपणास किती सुविचार सुचतात; पण कृति बहुशः उलट असते: असें कां व्हावें ? मनाला बंधन नाहीं म्हणून ! सुविचार आले कीं लागलीच ते लिहून ठेवण्याची संवय आपण करावी. लिहितां लिहितां व लिहून झाल्यावर सुद्धां त्यांवर सहजांत मनन करण्याची प्रवृत्ति होईल व मनन करतां करतां सहजांत ते आचारांत येतील. म्हणून प्रत्येकानें आपल्या गुणदोषांचें निरीक्षण स्वतः करावें व अनुभव लिहून ठेवावेत. त्यानें आत्मकल्याण तर होईलच. पण ते दुसऱ्यालाही मार्गदर्शक होतील. प्रत्येकानें स्वतःच्या दोषांचें व दुसऱ्यांच्या गुणांचें निरीक्षण करावें. नाहींतर आत्मस्तुति व परनिंदा अशी निरीक्षणाची पद्धत ठेविली, तर 'तो एक मूर्ख' हा श्री रामदासांचा अहेर पदरीं पडेल.

अ. २ ओ. ७७ ते ८९ श्रीबाबांच्या मुखींच्या म्हणून घातल्या आहेत. पण त्यांची भाषासरणी बाबांच्या मुखींची दिसत नाहीं, तरी त्या संदर्भाला अनुरूपि अशाच आहेत. पण, निरीक्षणांत प्रस्तुत मला त्या घ्यावयाच्या नाहींत. त्यांतील मथितार्थ वर आलाच आहे व पुढेंही येणार आहे.

**कै. नानासाहेब चांदोरकर** : नाना–संस्कृतमध्यें नाना या शब्दाचा अर्थ manifoldly म्हणजे 'विविध दृष्टया' असा आहे. शिवाय 'नाना' हा 'नाहीं नाहीं' "नेति नेति' याचा अपभ्रंशही होऊं शकेल व **विवेक** हेंच कार्य करतो: 'सत्' व "असत्' ह्यांमधील भेद विशद करून विवेक 'सत्'चें अद्वैत पटवितो; 'भासतें तसे नसतें' हें त्याचें संकलित कार्य होय. मायेचा फोलपणा दाखवून तो परमात्म्याची खरी जाणीव करून देतो. 'नाना'ची भूमिका अशीच आहे.

" केव्हां निघणार साई दर्शना । किमर्थ आळस शिरडी गमना ।
दीर्घसूत्रता कां प्रस्थाना । निश्चिती मना कां नाहीं ॥ " २-११९

हें त्यानेंच द्योतक आहे. विवेक मनाला अशीच टोंचणी देऊन मोक्षाकडे खेंचतो:--"साई परमात्म्याच्या दर्शनास केव्हां निघणार ? तुम्हांला मोक्षाची जिज्ञासा केव्हां होणार ? शिरडी-परब्रह्म-गमनास--आत्मज्ञानरूपि मोक्ष मिळविण्यास-आळस व मनाची चलबिचलता हीं उपयोगीं नाहींत. आळस व मनाचें चांचल्य हे मायेचे विकार आहेत. ज्याला आत्मज्ञान पाहिजे असेल, त्यानें ह्यांचा त्याग केला पाहिजे. विकारी वृत्ति सोडून विचारी बनलें पाहिजे !" असा त्याचा भावार्थ आहे व हेमाडपंताच्या मिषानें आपणां सर्वांनाच विवेकानें जागें केलें आहे व आत्मोन्मुख बनविलें आहे.

ह्यावरून श्रीबाबांनीं आपल्या परिवारास कशा विशिष्ट भूमिका व किती अर्थपूर्ण नांवें दिलीं आहेत हें विशद होतें. प्रत्येक गोष्ट घडवून आणण्यांत बाबांचा विशिष्ट हेतु 'आत्मोद्धार' हा असे व प्रत्येक भक्ताला अशा भूमिका दिल्यानें त्याचें आकलन सुलभ होतें.

## "दैव थोर कीं कर्तृत्व थोर" २-१५६

प्रयत्नच सर्वश्रेष्ठ आहे ! 'केल्यावीण कांहींच नाहीं' ! हें अक्षरशः खरें ! पण--? प्रयत्नाचें ध्येय काय---ऐहिक कीं अध्यात्मिक ? हा मुद्दा प्रयत्नवादी व प्रारब्धवादी दोघेही बहुशः विसरतात.

**ऐहिक ध्येय** घेतलें, तर प्रयत्न विफल ठरून दारुण निराशाच पदरीं येते हें पदोपदीं अनुभवास येतें. नाहींपेक्षां आज जे बेकार-निराश्रित व पराश्रित आहेत, ते सरसहा आळशी, निरुद्योगी, ऐतखाऊ इ. आहेत असें म्हणावें लागेल व तसें म्हणणें साहसाचें होईल. केवळ प्रयत्नानें पुढें आलेला असा एखाददुसरा इसम मिळणें मुष्किलीचें आहे, हें कोणीही विचारवंत कबूल करील; ऐहिक दृष्टया 'दैवंचैवात्र पञ्चमम्' हेंच प्रायः अनुभवास येतें. प्रारब्ध श्रेष्ठ ठरतें व प्रयत्नवाद लटका पडतो.

तेव्हां प्रयत्नाचें ध्येय **पारमार्थिकच** घेतलें पाहिजे व "उद्धरेदात्मनात्मानं ।" (२-१६०) 'केल्यावीण कांहींच नाहीं' 'चणे खाई लोखंडाचे । तेव्हां ब्रह्म पदीं नाचे ॥ इ. संतवचनें त्याचेच द्योतक आहेत. 'आत्मानम् उद्धरेत्' 'ब्रह्मपदीं नाचे' हें ध्येय ठेऊन मुमुक्षूला त्या दृष्टीनें प्रयत्न केला पाहिजे, तरच तो आत्मोद्धार करूं शकेल, एरवीं नाहीं. "त्याला तीव्र मुमुक्षता पाहिजे: 'सर्व कांहीं करीन पण हें कार्य साधीन' असें निरंतर वाटणें हीच तीव्र मुमुक्षुता. अशी, जी तीव्र मुमुक्षा ती एकटीच सर्व साधन-

समुदायांना पुरेशी आहे. कारण तीच पुरुषाला सर्व साधनांमध्यें प्रवृत्त करते. या प्रवृत्ती-लाच तत्परता म्हणतात: " श्री. द. भा. सं: प्र. १९

" ज्ञान हें कधींच साध्य असत नाहीं. तें स्वभात:च सिद्ध आहे. पण तें हजारो वासनांच्या चिखलांत बुडून गेलें असल्यामुळें कोणाला ओळखूं येत नाहीं; म्हणून चित्तांत पसरलेल्या वासनांचें निरसन करण्याकरितां साधन ( प्रयत्न )—ठेविलें आहे: वासनाक्षय झाला, कीं ज्ञान आपोआपच होतें: "–श्री. द. भा. सं. प्र. १९

" वासनांचे मुख्य तीन प्रकार आहेत.

(–श्री. द. भा. सं. प्र. १९, आधारें )

१ **अपराध-वासना**: वेदादिकांवर अश्रद्धा व विपरीत ग्रह हे मुख्य अपराध होत.

**त्याला साधन**: विचारपूर्वक निश्चय करणें म्हणजेच सुविचार व विवेक-ज्ञान मार्ग ( सविकल्प ज्ञान )

२ **कामावासना**: 'माझें हें कर्तव्य आहे: तें कर्तव्य आहे, इ. दृढ भावना.
**त्याल साधन**: वैराग्य, दोषदृष्टि म्हणजेच निष्काम कर्म करणें–कर्ममार्ग.

३ **कर्मवासना** पूर्वीच्या दुष्कृतजन्य संस्कारांचें बुद्धीवरील मालीन्य.
**त्याला साधन**—परमेश्वराची,स द्‌गुदूरुची कृपा-भक्तिमार्ग.

ह्यावरून हें स्पष्ट दिसून येईल कीं, ज्ञान, कर्म व भक्ति हे तीन्ही मार्ग तत्त्वत: अभेद आहेत व मुमुक्षूला त्यांपैकीं **प्रत्येकाची** जरूरी आहे. आतां त्यांपैकीं मुख्य कोणता घेऊन त्याला इतरांची जोड द्यावयाची–त्यांचा त्याग करावयाचा नव्हे व तो करूं म्हटल्यानें करतां येत नाहींच-हा वैयक्तिक व देशकालपरिस्थित्यनुरूप प्रश्न आहे. ध्येय एक असलें, म्हणजे मार्ग कोणताही स्वीकारला म्हणून हरकत नाहीं व श्रीबाबांनींही तसेंच केलें आहे. त्यांनीं 'सुलभ उपाव ' म्हणून 'भक्तिमार्ग मुख्य घेऊन त्याला 'ज्ञान' व 'कर्म' मार्गांची जोड सतत दिली आहे.

ज्ञान, भक्ति व कर्म यांपैकीं कोणताही मार्ग प्रमुख घेतला, तरी वासनाक्षय झाल्याखेरीज मोक्ष नाहीं. **वासनाक्षय प्रयत्नानेंच होतो**: आणि वासनाक्षय झाला, कीं अध्यात्मिक दृष्ट्या–ऐहिक दृष्ट्या नव्हे–प्रारब्ध कांहीं करूं शकत नाहीं; प्रयत्न श्रेष्ठ ठरतो व प्रारब्धवाद लटका पडतो !

वरीलप्रमाणें वस्तुस्थिति असतां ' दैव थोर कीं प्रारब्ध थोर?' २-१५६ या वादाचा केवळ तार्किक कोटया लढवून निकाल कसा लागेल ? ग्रंथकर्ता हा प्रथमत: केवळ '**ऐहिक प्रयत्नवादी**' होता, हें

' गुरु कशासी व्हावा कीं । बुडवून आपली स्वतंत्रता ।
ओढून घ्यावी कां परतंत्रता । जेथें निजकर्तव्य दक्षता ।
काय अवश्यकता गुरुची । ज्याचें त्यानेंच केलें पाहिजे ।
न करि त्यास गुरूनें काय कीजे । न हालवितां हातपाय जो निजे ।
तयास दीजें काय कवणें ॥ हाच माझा पक्ष उजू ॥" —२–१५० । ४

ह्यावरून स्पष्ट दिसून येतें. त्याला प्रयत्नवादाचें–' उद्धरेदात्मनात्मानम्–' याचें ध्येय काय हें उमगलें नव्हतें !

"असेल जें जें ललाटीं लिहिलें । तें तेंच जरी होणार वहिलें ।
मग तें गुरुविण काय कीं अडलें । जाणें ठेलें शिरडीचें " ॥२-१११

एवढयापुरतीच त्याला गुरूची महती माहित होती. म्हणजे त्याच्या वादाला अध्यात्मिक दृष्टया बुडच नव्हतें. तेव्हां एखाद्या बिनबुडाच्या भांड्यास जरा कलाटणी दिली, कीं तें जसें उलथतें, तसेंच येथें झालें आहे. वरील-प्रमाणें वाड्यांत आपला प्रयत्नवाद मांडून हेमाडपंत ज्या वेळीं श्रीबाबाच्या दर्शनास गेला, तेव्हां श्रीबाबांनीं 'काय चालिलें होतें वाड्यांत' २-१६६-मनांत संदेह कां ?-एवढीच दिलेली कोपरखळी त्यांच्या मतपरिवर्तनास पुरेशी होती व तसेंच झालें आहे. त्यामुळें त्याचे आचारविचार अजि बदलले व त्याचीच 'सच्चरिता'वर छाप पडली आहे. अशा तऱ्हेच्या क्रांत्या अशी उलटापालट घडवून आणतात. " गुरुविण काय कीं अडलें " २-१११ म्हणणारा ग्रंथकर्ता धुळींत "घातलें लोटांगण पायीं " २-१३७ अशी स्पष्ट कबुली स्वतःच देत आहे व 'करील त्याचेंच सर्व आहे ' २-१५९ हा त्याचा ऐहिक प्रयत्नवाद पार विरघळून, ' होणारा पुढें कांहींही न चालत' २-११४ असा पूर्ण प्रारब्धवादी तो बनला आहे. भक्तिमार्गांत प्रारब्ध म्हणजे 'सद्गुरु कृपा' व तीच त्यानें अथपासून इतिपर्यंत भाकिली आहे !

**हेमाडपंतः**—वरवर पाहतां 'वादावादी बरी हा वाग्बाण । अभिमानखंडण व्हावया । ' २-१८४ देऊन त्याचा मर्मभेद केलेला दिसतो खरा व ' संतां घरची उलटीच खूण ' ३२-९१ किंवा 'फकिरीचा माझ्या न्याराच कावा ' ३२-१५३ हें ग्रंथकर्त्याबाबत विशद करून, बाबांनीं मी मी म्हणणाऱ्यांनीं इकडे लक्ष द्यावें म्हणूनच कीं काय, जणूं ग्रंथ लिहिण्यास त्याचीच योजना केली आहे असें भासतें. म्हणजे वाच्या-र्थानें तें व्यंगोक्त नांव ठरतें. पण बाबा आपल्या भक्ताची अशी अवहेलना करणारे नव्हते. जशी प्रेमळ आई आपण स्वतः मुलाचे गालगुच्चे घेईल, पण दुसऱ्यानें त्याला हूं म्हटलेलें तिला खपणार नाहीं, तशीच बाबांची वृत्ति होती व सर्व संतांची तशीच असते. आपल्या खऱ्या भक्ताचा अभिमान प्रत्येक संताला व देवाला असतोच असतो व भक्तानें जर त्याच्याकडे ' आई'च्या भावनेनें पाहिलें, तर त्याला केव्हांही पान्हा फुटल्याखेरीज राहणार नाहीं. तो भक्ताचे कोड पुरवीलच पुरवील. पण आपण भक्त त्याची योग्यता जाणत नाहीं. आपणच अहंभावनेनें भटकतों, तेव्हां आपली गुरुमाउली स्वस्थ बसून कुर्मदृष्टीनें गंमत पाहत बसते. पण आपण आतां पडणार हें तिला कळतांच किंवा आपला आर्तस्वर कानीं पडतांच ती धांवत येऊन तारते. तेव्हां प्रत्येक भक्तानें जर त्याला सद्भक्त व्हावयाचें असेल, तर निरहंकार बाळवृत्तीनें गुरुमाउलीच्या कुशींत घुसावें व भक्तिप्रेमानें तिला पान्हा फोडावा ! असो. तेव्हां हेमाडपंत हें नांव बाबांनीं व्यंगोक्त खास दिलेलें नाहीं. पण तसेंच तें वायफळही दिलेलें नाहीं. मग त्याचा तत्त्वार्थ काय ? व्याकरणशुद्ध नाहीं तरी पर्यायानें—व संतसाधारणतः असे पर्याय अलंकारिक-शब्दच फार वापरतात—याची उपपत्ति अशी लावतां येईलः—

**हेम + अड् = हेमाड**

हेम:-The planet Mercury -बुधग्रह ·

बुधासी बुद्धि भारी । तो कोणाची निष्ठुरता न करी ।
संसारचिंता हरि प्राणिमात्रांची ॥" —शनिमहात्म्य

अड् to obtain-मिळविणें

**हेमाडः—** बुधाची योग्यता ज्यांनीं मिळविली आहे,तो ग्रंथकर्ता असाच होताः बुद्धीनें तल्लख व स्वभावानें प्रेमळ असून त्यानें लिहिलेल्या 'सच्चरिता'मुळें प्राणिमात्रांची चिंता हरण होणार आहे.

तेव्हां 'हेमाड' हें नांव श्रीबाबांनीं असें अर्थपूर्णच दिलेलें होतें. हेमाडपंताकडे साधकानें त्याच आदरयुक्त भावनेनें पाहिलें पाहिजेः तरच त्याला 'सच्चरितां'त अंतःप्रवेश मिळेलः नाहींपेक्षां गोचडीसारखें बाह्यांगालाच चिकटून राहिल्यास आचळांतील दूध मिळण्याएवजीं रक्त मात्र तोंडीं पडेल !

**'तंव तो सुचवी वेळेवरः'** २.१२७ ( कथाभाग १२५-१३० ) "ग्रंथकर्ता शिरडी गमनाच्या वेळीं 'दादर'वर उतरून मनमाडची मेल गांठणार होताः पण बांद्रा स्टेशनवर एक 'यवन' गाडींत आला व त्यानें 'मेल दादरला थांबत नाहींः तेव्हां बोरीबंदरवरच बसण्यास जा !' म्हणून वेळेवर सुचविलें !" श्रीबाबांचा परकायाप्रवेशामध्यें हातखंडा होता. त्याचेंच हें द्योतक आहे.

एकदा भक्तिमार्गांत पडला कीं परमेश्वर चरकांत घातल्याप्रमाणें भक्ताला आपल्या पायाशीं कसा खेंचतो, तेंही यावरून कळून येईल. मला स्वतःला शिरडीस जाण्याचा योग असाच अकल्पित घडून आला. कार्तिक शु. १४ शके १८५६ ला मी शिरडीस गेलों व दुसऱ्या दिवशीं 'त्रिपुरि' पौर्णिमेस यथामति श्रीसेवा करून परत आलों. जळगांवाला कामानिमित्त जाण्याचें एकाएकी ठरलें. मी पुण्यास होतों. मला दौंडमनमाडमार्गें वा परस्पर कल्याणहून गाडी बदलून जातां आलें असतें. पण तसें न करतां मुंबईकडून जाण्याची बुद्धि झाली. मी दादरला उतरलों व रात्रीच्या गाडीनें जळगांवला गेलोंः दादरवर आकस्मिक माझा 'दत्त' मला भेटलाः मीं भक्तिपुरःसर दर्शन घेतलें व त्यानें 'परत जातांना वाटेल त्या मार्गानें जा' असा मोघमांत संदेश दिला. मला त्या वेळीं त्याचा उलगडा झाला नाहीं. पुढें कळून आलें. दादरवर माझे एक आप्त श्रीबाबांचे भक्त आहेत; त्यांनीं प्रेमपुरस्सर सुचविलें कीं, "जळगांवपर्यंत जातां आहांतच, तेव्हां ही श्रीबाबांचीच सूचना समजून परत जातांना सवड झाल्यास शिरडीला उतरून दर्शन घेऊन दौंडमार्गें जा !" मी त्याचा अगत्य विचार करण्याचें कबूल केलेंः जळगांवला मी सकाळीं ६ वाजतां उतरलों. तेथील कामें सकाळीं नऊ वाजेपर्यंत सहजांत आटोपलीं गेलीं. तेव्हां मी तावडतोब ११॥ च्या गाडीनें निघून मनमाडला आलों. मनमाड स्टेशनवर दोन-तीन हमाल मजकडे आले. पण सामान विशेष नसल्यामुळें त्यांना नकार देऊन मी स्वतःच तें घेऊन उतरलों. इतक्यांत एका हमालानें पाठूनच माझें सामान ओढून घेतलें व "कोठें जावयाचें ?" म्हणून

मला विचारलें. विशेष म्हणजे बळेंच सामान ओढून घेतल्यामुळें त्यावर न रागावतां मीं त्याला ' शिरडीला ' म्हणून उत्तर दिलें. हें कानीं पडतांच त्याला ' भक्तीचें भरतें ' आलें व 'आपल्या बाबाकडे ? ' असें तो प्रश्नार्थक उद्‌गारला. मीं हो म्हणतांच त्याला आनंदातिरेक होण्याची वेळ आली. मी साहेबी पोशाखांतला व तो हमाल हा भेद विसरून त्यानें स्वतः–मी नको म्हणत असतां-मला चहा, पान देऊन मोटरींत बसवून दिलें, व मोटरवाल्याला–कारण मोटर येवल्यापर्यंतच जाणार होती-मला पुढील मोटरींत बसवून देण्याची व्यवस्था करण्यास तीनतीनदां बजावून सांगितलें व मलाही मी परत आल्यावर एक पत्र त्याला टाकण्यास त्यानें सांगितलें. मीं त्याला योग्य ती बिदागी दिली व परत आल्यावर अगत्यानें पत्र व 'उद्री' पाठविली. त्या हमालाचें नांव 'पर्वतिबाबा' ( रेल्वे कुली नं ८, मनमाड ) आहे. माझा पुढील प्रवास निर्विघ्न झाला. शिरडींत गेल्यावर प्रथम मी श्री.माधवरावांकडेच उतरलों व प्रथम त्यांचेच पाय धरले. त्यांचा प्रेमळ सहवास व शुभाशीर्वाद; इतर भक्तमंडळीची ओळख व त्रिपुरी पौर्णिमेच्या दिवशीं श्रीसेवा हीं लाभलीं. पुढें मी साकोरीस गेलों. जरी मी अवेळीं गेलों, तरी श्रीउपासनींनीं मला अगत्य दर्शन दिलें व तेंही पूर्ण सात्त्विक असेंच दिलें व माझा आदर संपादन केला. सायंकाळीं चितळी स्टेशनवर गाडींत बसून पुण्यास परत आलों: ह्याही गोष्टी अघटित अशा झाल्या. विशेष म्हणजे मला जळगांवास जाण्याची वास्तविक जरुरच पडली नसती.कारण नित्याप्रमाणें जळगांवला जाण्याचें ठरल्यावर,मी श्री. माधवनाथांनी अनुज्ञा घेण्यास गेलों असतां "उगीच हेलपटा पडणार आहे; जातोस तें काम इतक्यांत होणें नाहीं " असें स्पष्ट शब्दांत श्रींनीं सांगितलें. पण तरीही श्रींनींच मला ' पण एक खेप टाकून येच' असा आग्रह केला व जाण्यस आज्ञा दिली; माझ्या कामाचें तसेंच झालें. पण हा शिरडीगमनाचा सुयोग त्यानिमित्तानें तरी घडला; व श्रीहेमाडपंतांनीं आपला अनुभव सांगितला म्हणून मलाही माझ्या सांगण्याचा मोह आवरेना !

पण अशा अनुभवांचा जर मी पाढा वाचावयास लागलों, तर तें एक बाड होईल व मूळ प्रयोजन बाजूला राहील. प्रस्तुत अध्यायांत आपण बुद्धिदेवीला अभिवादन करून विचार व विवेक यांची जोड मिळविली; कर्म श्रेष्ठ कीं दैव श्रेष्ठ याचा अध्यात्मक निर्णय करून हेमाडपंतांचा परिचय करून घेतला; व वासनात्रयी व ती निरसण्याचीं साधनें यांचा बोध करून घेतला, त्यांत कर्मवासना ही गुरुकृपेशिवाय नष्ट होत नाहीं; आपला ती नष्ट होण्याचा समय आला म्हणूनच आपण भक्तिमार्गात पडलों आहोंत. तेव्हां आपणांस अशीं प्रत्यंतरें हीं येणारच. मात्र त्याबाबत शोधक दृष्टि आपण ठेवली पाहिजे. हे अनुभव कसे येतात याचें उत्तर श्रीगुरुचरणीं मस्तक लीन केल्यानेंच मूकत्वांत मिळतें. तेव्हां आपण आतां तसेंच करूं !

॥ इति द्वितीयाध्याय निरीक्षणम् ॥

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याच्या अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हास कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमच्याकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी

वार्षिक वर्गणी टपालखर्चासह मनिऑर्डरीनें आगाऊ रु ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाच्या दोन्ही बाजूंस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्या-प्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हाला कळ-विल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमच्याकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्ही घेत नाहीं.

५ लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक, **श्रीसाईलीला**

दक्षिणा प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनीं उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणूमहाराज ह्यांनीं नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर, M. A., LL. B. ह्यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी–भावार्थ–दीपिका**

हा नरेंद्र बुक डेपो, दादर, मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.

# सांडू ब्रदर्स

ओरिजिनल

## ब्राह्मी तेल

मेंदूचे सर्व विकारांवर.

## खर्जुरासव

दमा, खोकला, व क्षय यांवर.

## महारास्नादि काढा योगराजगुग्गुळ

सर्व प्रकारचे वातविकारांवर.

**द. कृ. सांडू ब्रदर्स** आर्यौषधि-कारखाना. चेंबूर-मुंबई.

हें पुस्तक श्रीलक्ष्मी-नारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें
रामचंद्र काशीनाथ तटणीस यांनीं छापून
सं.दी.नवलकर यांनीं श्रीसाईभवन. १४१ प्रिन्सेस स्ट्रीट [illegible]